म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
स. नं. ९३७२
९०५८

# छोरी

मंगेश पाडगांवकर

REFBK-0009413
REFBK-0009413

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 29093 वि: 3104
क्रमांक 9302 नों: दि: 25/5/80.

# छोरी

क्रमांक .......................... नों. दि. ..........

मंगेश पाडगांवकर

REFBK-0009413

REFBK-0009413

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९४९३

पॉप्युलर बुक डेपो, मुंबई ७

मूल्य तीन रुपये

प्रकाशक :
गणेश रामराव भटकळ
पॉप्युलर बुक डेपो
लॅमिंग्टन रोड, मुंबई ७

प्रथमावृत्ति
वैशाख १८७९
मे १९५७

सर्व हक्क स्वाधीन

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

आईवडिलांच्या चरणीं...

अनुक्रम २९८९३ दि ३१८५
क्रमांक ९३५८२ नों: दि: २८/५/५८

# माझ्या काव्याची भूमिका

माझ्या कवितेच्या स्वरूपाविषयीं किंवा तिच्या मागच्या प्रेरणांविषयीं हेतुपुरःसर असा विचार मीं कधींच केलेला नाहीं. पुष्कळ वेळां एखादी कविता लिहून झाल्यानंतर ती कशी काय सुचली याचें मलाच कोडें पडतें. अशा वेळीं एखाद्या तिऱ्हाइताच्या कुतूहलानें मी माझ्या मनांत डोकावून बघतों. तर्काच्या साहाय्यानें, आठवणींच्या प्रकाशांत मी कांहीं दुवेहि जुळवतों; पण लवकरच माझ्या या प्रयत्नाचें वैय्यर्थ्य माझ्या ध्यानांत येतें. निर्मितीच्या प्रक्रियेचें गूढ स्वरूप अजून मला आकळलेलें नाहीं. माझ्या नकळत मनांत खोल कुठें तरी रुजलेला अनुभूतीचा क्षण, मातीचें कवच भेदून वर येणाऱ्या हिरव्यागार पात्याप्रमाणें, केव्हां आणि कसा प्रकट होतो याचें रहस्य मला अजूनहि उकललेलें नाहीं. तो क्षण अपरिहार्य असतो, अनपेक्षित असतो, एवढेंच मी त्याच्याविषयीं सांगू शकेन. ‘निर्मिति’ या माझ्या कवितेंत त्या क्षणाची गूढता व्यक्त करण्याचा मीं प्रयत्न केलेला आहे :

*त्या क्षणिं या आकृतिचें बंधन*
*मलाच माझें नकळत गळलें*
*विदेहीच त्या क्षणीं परंतू*
*आकाराचें रहस्य कळलें :*

*रहस्य कळलें अंधाराला*
*कळलें नक्षत्रांशीं नातें*
*अन् मी भेदुनि भूमीचा थर*
*रुजलों होउनि हिरवें पातें !*

या ओळी लिहीत असतांना त्याच क्षणाचें मी चिंतन करीत होतों, त्या गूढतेनें मी भारावून गेलों होतों.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ८४९३
संग्रहालय

लहानपणापासून, म्हणजे वयाच्या नवव्या-दहाव्या वर्षापासूनच, मी कविता लिहूं लागलों. सहज छंद म्हणून एकादी गोष्ट करावी, आणि नंतर तीच एक जबरदस्त, कधींहि न सुटणारें व्यसन व्हावी, तसेंच माझें कवितेच्या बाबतींत झालें. तेव्हांच्या त्या कविता आठवल्या कीं आज गंमत वाटते. त्या कविता वाचीत असतांना एक गोष्ट मात्र निश्चित जाणवते : शब्दांसाठीं, वृत्तांसाठीं मला कधींच अडून बसावें लागलें नाहीं. हें कसें काय शक्य झालें? वृत्तां-छंदांचा 'अभ्यास' मीं कुठें केला? काव्य-निर्मितीविषयीं स्थूल कुतूहल बाळगणाऱ्यांना या प्रश्नाचें फारच महत्त्व वाटतें. मी टला ट जुळवूं लागल्याचें ध्यानांत येतांच परशुरामतात्या गोडबोले यांचें 'वृत्तदर्पण' मला आणून देण्यांत आलें. मोठ्या उत्साहानें मीं तें उघडलें. परंतु 'मासाजासतताग' हें वाचून मीं एवढा धसका घेतला कीं पुन्हां तें पुस्तक उघडण्याचें धाडस मला झालें नाहीं. कविता वाचण्याचें, आणि आवडलेल्या कविता स्वतःशींच गुणगुणण्याचें मला वेड होतें. या गुणगुणण्यानेंच माझ्यावर संस्कार केले; गणमात्रांचें व्याकरण न घोकतांहि तें ज्ञान मला सहजतया झालें. त्यांत खटपट नव्हती, खटाटोप नव्हता : होती फक्त कवितेवरची अनिवार भक्ति! या गुणगुणण्याच्या संवयीचा माझ्या कविता लिहिण्याच्या पद्धतीवर फार मोठा परिणाम झाला. कागद-पेन्सिल घेऊन, मांडी ठोकून मी कविता लिहायला कधीं बसलों नाहीं. सुचलेली कविता एकाद्या फुलपांखरासारखी माझ्या मनांत भिरभिरूं लागली. गुणगुणतांगुणगुणतांनाच ती पूर्ण होऊं लागली. यासाठीं लागणारी एक विशिष्ट तऱ्हेची स्मरणशक्ति अपरिहार्यपणें माझ्यांत विकसित झाली.

सुरुवातीसुरुवातीच्या माझ्या कवितांत काव्यापेक्षां उत्साह अधिक होता. धर विषय आणि कर कविता असाच तेव्हांचा खाक्या होता. एखादी कल्पना मनांत आली कीं ती छंदोबद्ध करून ठेवायची आणि मग वहींत सुवाच्य अक्षरांत कविता उतरून काढून तिच्याखालीं लपेटदार सही ठोकायची! पहिलें यमक मीं जुळवलें त्या क्षणीं मी कुणी तरी विशेष आहें याची मला प्रचीति आली! माझ्या अहंतेचा रथ भूमीपासून दोन वितींवर चालूं लागला! तो क्षण माझ्या जीवनांत क्रांति करणारा होता.

कारण मला जें वाटलें, जें मला जाणवलें, तें महत्त्वाचें आहे, असा आत्मविश्वास माझ्या मनांत त्या क्षणापासून बाणला गेला. माझे अनुभव, माझ्या भावना शब्दांच्या साहाय्यानें व्यक्त करण्यांत, त्यांतून कांहीं तरी निर्माण करण्यांत मला विलक्षण आनंद, कृतार्थता वाटूं लागली. 'मातींत लोळणाऱ्या सुस्त जड सुरवंटाला पंख फुटावेत' तसेच माझ्या 'सुस्त अस्तित्वाला अचानक पंख फुटले होते.' मी कांहीं तरी अनुभवीत होतों, व्यक्त करीत होतों, निर्माण करीत होतों—मी जगूं लागलों होतों!

माझ्या अनुभवविश्वाला हळूहळू आकार येऊं लागला होता—व्यक्तित्व प्राप्त होऊं लागलें होतें. पण या गोष्टीला बराच वेळ जावा लागला. माझ्या आरंभींच्या कवितांतले अनुभव हे संपूर्णपणें माझे नव्हते. ज्या कविता मी आवडीनें वाचीत होतों, गुणगुणत होतों, त्यांनीं माझ्या मनांत त्या अनुभवांची अवस्था निर्माण होई; आणि या मनोवस्थेला मी शब्दरूप देण्याची धडपड करीत असें. त्या काळांत मी जें व्यक्त करीत होतों तो अनुभव माझा नव्हता; कुणाच्या तरी अनुभूतीचा माझ्या मनांत उमटणारा तो प्रतिध्वनि होता, तरंग होता. या कालखंडांत शब्दरचनेची साधना मीं केली हें खरें, पण माझ्या व्यक्तित्वाचा घाट माझ्या त्या कवितांना अर्थातच येऊं शकला नाहीं. कांहीं काळानंतर ही गोष्ट आपोआपच माझ्या ध्यानांत आली. अनुभव घेण्याची माझ्या मनाची क्षमता जसजशी वाढूं लागली, माझे अनुभव जसजसे तीव्र होऊं लागले, तसतसें हें उसनेंपण आपोआप गळून जाऊं लागलें. त्यासाठीं जाणीवपूर्वक अशी खटपट मला करावी लागली नाहीं. 'मी' आतां 'खरोखरीच मी' होतों : उसन्या अनुभवांचा संसार थाटण्याचें आतां कारण उरलें नव्हतें.

निसर्ग ही माझ्या कवितेची अगदीं पहिली प्रेरणा. माझें लहानपण कोंकणांत—वेंगुर्ल्याला—गेलें. हिरव्या चवऱ्या ढाळणारे उंच माड, निळें आकाश, आपल्याच तंद्रींत पळणाऱ्या लाल मातीच्या वाटा...या सर्वांनीं माझ्या नकळतच माझ्या मनाशीं आपलें नातें जोडलें होतें. आपले रंग त्यांनीं माझ्या अनुभवांत भरले होते; माझ्या भावनांना त्यांनीं ताल दिला होता; आपल्या रूपसौंदर्याच्या असंख्य प्रतिमा त्यांनीं माझ्या मनांत

उधळून दिल्या होत्या. निसर्गाच्या विविध अवस्थांचें दर्शन या काळांत मला अनायासें घडलें. मनांत रुजलेल्या या अनुभव-प्रतिमांना हळूहळू शब्दांचे अंकुर फुटूं लागले. यापूर्वी मी शब्द जमवीत होतों आणि जुळवीत होतों. आतां शब्द निर्माण होत होते. त्यांची आकृति (pattern) जुळवण्यासाठीं मला प्रयत्न करावा लागत नव्हता. कळींत फूल लपलेलें असावें तशी या शब्दांतच ही आकृति जणुं उपजतच होती. कसल्या तरी अपरिहार्य प्रेरणेनें ती आपल्या पूर्णरूपाचा मागोवा घेत उमलत होती —साकारत होती.

माझी अनुभूति वेगवेगळ्या अवस्थांतून जात होती; आणि त्या त्या वेळीं माझी कविताहि नवीं नवीं स्थित्यंतरें अनुभवीत होती. अगदीं प्रथम आकारसौंदर्याचीच जाणीव प्रबळ होती. डोळ्यांना सुखवणारें निसर्गाचें रूप चितारण्याचा मी प्रयत्न करीत होतों. या अवस्थेंत माझ्या अनुभवासारखेंच माझ्या कवितेचें स्वरूप स्थूल होतें. झगमगणारे शब्द आणि रूपकें यांनीं मी तेव्हां माझी कविता शृंगारीत असें. शब्दांच्या अर्थापेक्षां त्यांचा नाद मला अधिक महत्त्वाचा वाटे : मी शब्दांच्या नादीं लागलों होतों. अनुभवाचें खास स्वतःचें असें संगीत आहे—नादतत्त्व आहे—याची मला पुसट जाणीवहि या काळांत नव्हती. एकाद्या अनुभवाच्या पहिल्या आवेगासरशीं एकादी ओळ अकस्मात् माझ्या मनांत निर्माण होत असे. मग ती ओळ मी गुणगुणूं लागे. त्या ओळीच्या सूत्रांत मी इतर कडव्यांचे मणी ओवीत असें. पहिल्या कांहीं ओळी लिहून झाल्या कीं, मला काय सांगायचें आहे याचा निश्चित अंदाज मला येई, आणि मग शेवटचें कडवें तयार होत असे. शेवटचें कडवें झालें कीं, त्या कडव्यांच्या अनुरोधानें पुन्हा प्रवासाला सुरुवात होई ! आरंभीचें कडवें आणि शेवटचें कडवें यांतलें अंतर हळूहळू निरनिराळ्या सजावटवजा प्रतिमांनीं भरलें जाई. भूमितीचें एखादें प्रमेय सोडवावें तशी ही लेखनपद्धति होती. या काळांत कवितेंतल्या शब्दांना कार्य होतें तें नटण्याचें, आणि कवितेंतल्या कडव्याचें कार्य होतें गृहीत अनुभवाचें (भूमितींतल्या गृहीत तत्त्वासारखें) स्पष्टीकरण करणें. ही प्रक्रिया स्थूल असली तरी शुष्क मात्र

खास नव्हती. शब्दांच्या नादसौंदर्यानें धुंद होऊन मी काव्यनिर्मिति करीत असें. ही धुंदी उतरली कीं स्वर्गातून पृथ्वीवर उतरल्यासारखें मला वाटे ! या कवितेचें स्वरूप स्पष्टीकरणात्मक असल्यामुळें ही कविता समजायला सोपी होती; आणि कांहीं काळानें त्याची सवय झाल्यावर तसें लिहिणेंहि मला सोपें जाऊं लागलें. हें सोपें झाल्याची जाणीव ज्या क्षणीं झाली, त्या क्षणींच या पद्धतीची मर्यादा मला जाणवली.

माझी काव्यनिर्मितीची पद्धत ठरून गेली होती, तिचा सांचा झाला होता; आणि माझा प्रत्येक अनुभव फोटोच्या फ्रेममध्यें फोटो बसवावा त्याप्रमाणें या सांच्यांत मी बसवूं लागलों होतों. हा सांचा मला इतका महत्त्वाचा वाटूं लागला होता कीं त्यांत अनुभव नीट, चपखल बसावे म्हणून त्यांना मी सोयीस्कर मुरड देऊं लागलों होतों. त्यांत एका विशिष्ट मर्यादेपर्यंत सौंदर्य होतें, पण तें कुसरीचें सौंदर्य होतें : निर्मितीच्या अपरिहार्यतेपेक्षां कारागिरीची सफाईच त्यांत अधिक होती. या मर्यादेची जाणीव मला ज्या क्षणीं झाली तो क्षण म्हणजे माझ्या काव्यजीवनांतलें एक नवें संक्रमण होतें. हें संक्रमण केवळ बाह्य स्वरूपाचें नव्हतें; त्याचें स्वरूप मूलग्राही होतें. तें केवळ विचारचिंतनांतून वा काव्यसिद्धांतांच्या घटपटचर्चेतून निर्माण झालेलें नव्हतें. अनुभूतीच्या स्थित्यंतराची ती खूण होती : जाणिवेच्या एका नव्या स्तरावर मी जगत होतों. माझ्या अनुभवांना 'माझ्या' व्यक्तिमत्त्वाचा असा निश्चित रंग येऊं लागला होता. त्यांतले कांहीं अनुभव इतके उत्कट आणि जोरकस होते कीं मीं सवयीनें हस्तगत किंवा शब्दगत केलेल्या सांच्यांत यांत्रिक निमूटपणानें स्वतःला बंदिस्त करून घ्यायचें त्या अनुभवांनीं साफ नाकारलें. ते अनुभव साकार करायचे म्हणजे कालपर्यंतच्या तयार साच्यांत मन न अडकूं देतां एक वेगळी, नवी अशी आकृति निर्माण होणें अत्यंत आवश्यक होतें.

या स्थित्यंतराच्या क्षणीं मला आणखी एक महत्त्वाची गोष्ट जाणवली होती; आणि ती म्हणजे माझ्या अनुभवाचें मूळ स्वरूप आणि त्याचें कवितेंतलें स्वरूप. कवितेच्या सौंदर्याविषयीं कांहीं संकेत मीं कळत न कळत मनाशीं बाळगले होते. मनाशीं बाळगलेल्या या संकेतांचा परिणाम

असा झाला होता कीं, अनुभवाचें सौंदर्य शक्य तों अविकृत ठेवण्याचा प्रयत्न करण्याऐवजीं मी माझ्या अनुभवांना या संकेतांबरहुकूम सौंदर्याची 'पोज' घ्यायला लावत असें. फोटोसाठीं ठरवून, पोज घेऊन एकाद्या व्यक्तीनें बसावें, तसे माझे अनुभव कवितेसाठीं 'पोज' घेऊन बसत. अर्थात् हें मी अगदीं जाणीवपूर्वक करीत असें असें नाहीं; माझ्या नकळत हें सारें घडत असे. या गोष्टीची जाणीव जेव्हां झाली तेव्हांच मला 'आत्मनिष्ठा' या वाङ्मयांत सरास वापरल्या जाणाऱ्या शब्दाचा खरा अर्थ कळला. माझ्या 'धारानृत्य' या पहिल्या कवितासंग्रहानंतरच्या माझ्या कवितेचें स्वरूप बदललें त्याचें हें एक महत्त्वाचें कारण आहे.

अनुभूतीचें आणि त्याचबरोबर कवितेचें बहिर्मुख स्वरूप अशा रीतीनें पालटत गेलें. प्रत्येक अनुभव आतां मला अर्थपूर्ण (significant) वाटूं लागला. त्या अनुभवाचें स्वरूप समजून घ्यावें, त्यांतलें सत्य हुडकावें, असें तीव्रतेनें वाटूं लागलें; अनुभवविश्वाविषयीं सुजाण, संवेदनशील असें कुतूहल मला वाटूं लागलें. या स्थित्यंतराबरोबर एक विलक्षण अस्वस्थता माझ्या मनांत निर्माण झाली. मनांतल्या 'जिप्सी'ला जाग आली होती. मींच माझ्यासाठीं निर्माण केलेले, कवटाळलेले संकेत झिजल्यागत वाटूं लागले होते. तो अनुभव विचित्र होता. पराकाष्ठेनें जपलेलें, जोपासलेलें उध्वस्त करण्याची प्रमाथी शक्ति त्यांत होती; पण त्याबरोबरच त्याची दुसरीहि एक बाजू होती. ही उध्वस्तता पाहण्याचें सामर्थ्य माझ्यांत आलें होतें. 'गूढ अंधुक पुसट' असें नवीन कांहीं तरी मला जाणवूं लागलें होतें. वाद, धर्म, पंथ यांचे सांचे माझ्या मनानें कधींच स्वीकारले नव्हते. हीं झांपडें डोळ्यांना बांधून घेण्याचें माझ्या कवितेनें नाकारलें होतें; परंतु आतां माझेच अनुभव, मींच निर्माण केलेले शब्द, अभिव्यक्तीच्या लकबी यांचे सांचे झाले होते. आणि हें सारें माझ्याच मनांत होत होतें. हें झुगारून देणें सोपें नव्हतें. कारण मला माझ्याच विरुद्ध बंड करावें लागणार होतें. माझ्या 'जिप्सी' या कवितेंत या मनोवस्थेचें चित्रण करण्याचा मीं प्रयत्न केला आहे. आकार निर्माण करणाऱ्या परंतु कुठल्याहि सांच्यांत—मग तो स्वयंनिर्मित कां असेना—बंदिस्त होऊं नये म्हणून धडपडणाऱ्या,

जीवनाविषयीं अपार कुतूहल असणाऱ्या सृजनशील मनाची धडपड ' जिप्सी 'चें प्रतीक घेऊन मीं व्यक्त केली आहे :

*कधीं कधीं पहाटते उरीं आगळी प्रतीति*
*जाळीमधून धुक्याच्या तेज झिरपतें चित्तीं*
*जाचूं लागते जिप्सीला ज्ञात विश्वाची चौकट*
*आणि जाणवतें कांहीं गूढ अंधुक पुसट*
*खेळ मांडिलेला सारा पुन्हा उधळाया सजे*
*आपणच निर्मिलेलें आपणच मोडूं धजे...*

कांहीं तरी उधळलें जात होतें, मोडलें जात होतें, आणि या उध्वस्ततेंतूनहि एक हिरवा क्षण अंकुरत होता—लवलवत होता.

प्रेम आणि निसर्ग यांच्याविषयींचे अनुभव या काळांत माझ्या मनांत तरळत होते. निसर्गावर यापूर्वींहि मीं कविता लिहिल्या होत्या; पण निसर्गकविता लिहिणें म्हणजे निसर्गाचें हुबेहूब वर्णन करणें अशीच माझी कल्पना होती. अशा तऱ्हेच्या ' वर्णनांत ' उपमाउत्प्रेक्षांची कसरत असे; पण त्यांत अर्थात् अनुभूतीचा जिवंतपणा नव्हता ! निसर्गावर एखाद्या विचाराचें रूपक बांधूनहि मी कविता लिहीत होतों. अशा तऱ्हेच्या कवितांत दुय्यम महत्त्वाचें असें एक नाममात्र साधन एवढेंच निसर्गाला स्थान होतें. परंतु निसर्गाच्या दर्शनानें जेव्हां माझ्या मनांत विविध भाववृत्ति जागृत होऊं लागल्या तेव्हां रूपक ' बांधण्याची ' ही बौद्धिक कसरत मला अर्थशून्य वाटूं लागली. निसर्गाच्या दर्शनानें मनांत तरळणाऱ्या रंगगंधांच्या तरल संवेदनांतून-देखील काव्य निर्माण होऊं शकतें याची मला जाणीव झाली. या सूक्ष्म, तरल संवेदना भाववृत्तींशीं एकजीव झालेल्या असतात. तथाकथित रूपकें किंवा रूपकांच्या आश्रयानें व्यक्त होणारा विचार जरी या कवितांत नसला तरी या संवेदना हाच एक अत्यंत सखोल असा अनुभव असूं शकतो. शब्द या माध्यमाच्या द्वारें येणारा अनुभव प्रत्यक्ष सेंद्रिय नसतो, कल्पनेच्या पातळीवरूनच तो घ्यावा लागतो. आणि म्हणूनच शब्दांतून उन्हाचा

संग्रहालय, ठाणे

पिवळेपणा अनुभवायला लावणें किंवा एकाद्या चिमुकल्या थेंबाचा लुकलुकता गारवा प्रत्ययाला आणून देणें हें कलेच्या दृष्टीनें एखादा विचार तर्कनिष्ठ संगतीनें मांडण्यापेक्षां अनंत पटींनीं अधिक कठिण असतें. अशा कवितांतून एकादी तरल भाववृत्ति व्यक्त करीत असतांना या संवेदनांचें एका निराळ्या पद्धतीनें संघटन करावें लागतें. अशा तऱ्हेच्या संघटनांत उपमा-उत्प्रेक्षा ही एक साम्याधिष्ठित चमत्कृति अशी जाणीव असूंच शकत नाहीं. प्रत्येक विशेषण, प्रत्येक उपमा ही भाववृत्तीनें भरलेली असते—विलक्षण संवेदनागर्भ झालेली असते.

अशा तऱ्हेच्या अनुभूतीमुळें निसर्गवर्णनाचा धोपटमार्ग सोडून देणें मला भाग पडलें. 'जांभळी नीज ये' ही माझी कविता या नव्या जाणिवेची निदर्शक अशी कविता असें म्हणायला हरकत नाहीं. या कवितेंतल्या रंगसंवेदना, निसर्गातल्या प्रतिमा, एक विशिष्ट भाववृत्ति आणि या सर्वांच्या गुंफणींतून निर्माण झालेली आकृति यांना वेगळें करून पाहणें केवळ अशक्य आहे.

*जांभळी नीज ये, जांभळी नीज ये*
*कंप काळे निळे*
*त्यांत छाया मिळे*
*जलदरूपें ध्वनी मंदिरांतून ये*
*जांभळी नीज ये जांभळी नीज ये*

—अशी या कवितेची सुरुवात होती. नीज, रात्रीचें कंपाकुल वातावरण, आणि जडावलेला जांभळा रंग यांच्यांत अनुभवाचें एक वेगळेंच नातें निर्माण झालें होतें. हें नातें व्यक्त करण्यासाठीं 'जांभळी नीज ये' हा तर्काला हुलकावणी देणारा शब्दप्रयोग करणें मला आवश्यक वाटत होतें.

यानंतरच्या माझ्या निसर्गकवितांचें स्वरूप स्वाभाविकच पार बदललें. निसर्ग हा खऱ्याखुऱ्या अर्थानें माझ्या अनुभूतीचा भाग बनला. एका विशिष्ट भाववृत्तीनें भारलेली एखादी सूचक प्रतिमा माझ्या मनांत तरळूं लागली. त्या प्रतिमेंतूनच सर्व कविता हळूहळू उमलून येऊं लागली. ज्या

पद्धतीनें मी पूर्वी कविता लिहीत होतों त्याहून निर्मितीची ही प्रक्रिया वेगळया जातीची होती. या वेगळ्या प्रक्रियेचा परिणाम माझ्या निसर्ग-कवितांवरच नव्हे, तर सर्व कवितांवरच झाला. पूर्वीच्या माझ्या कवितेंत ध्रुवपद हा मध्यबिंदु होता. मनांतला आशय प्रथम आकर्षक असें ध्रुवपद होऊनच येत असे. या ध्रुवपदांत आशय सारांशरूपानें ठासून भरलेला असे. या ध्रुवपदानें कवितेला आरंभ होत असे. ध्रुवपदा-नंतर इतर कडवीं येत. ध्रुवपदांतला आशय समजावून सांगणें, त्याचें विस्तारात्मक असें स्पष्टीकरण करणें हें या कडव्यांचें कार्य असे. या स्पष्टीकरणाच्या कार्यामुळें सर्व कडव्यांतली संगति ही तर्कनिष्ठ संगति असे. सर्व कडव्यांची घडण एका विशिष्ट तऱ्हेनेंच होत असे. त्याच्यांत वेगळेपणा असे तो फक्त उपमा-उत्प्रेक्षांचा, कल्पनांचा. आणि या उपमा-उत्प्रेक्षा जरी कितीहि विविध असल्या तरी ध्रुवपदाच्या खुंटीला तर्कनिष्ठ संगतीच्या मजबूत धाग्यानें त्या घट्ट बांधून ठेवलेल्या असत. एखादें कडवें मणी मागेंपुढें करावे तसें वरखालीं केलें तरी फारसा फरक कवितेंत पडत नसे. एखाद्या कवितेचा संकलित असा परिणाम होणें ही गोष्ट खरें म्हणजे अत्यंत महत्त्वाची असते. हा संकलित परिणाम कवितें-तल्या अनुभवानें भारलेल्या अनेक घटकांच्या कलात्मक संघटनेनें होत असतो. परंतु मला असें आढळून आलें कीं, अशा तऱ्हेची घडण असलेल्या कवितेंत हा संकलित परिणाम खऱ्याखुऱ्या अर्थानें कधींच घडून येत नाहीं. ध्रुवपदाच्या अनुरोधानें इतर कडवीं फरफटत नेल्यामुळें अनुभव समजावून सांगण्याची भूमिका कवि नकळत घेऊं लागतो. त्यामुळें अनुभूति आणि प्रतिमासृष्टि यांचें एकात्म असें स्वरूप राहत नाहीं. स्वाभाविकच, ध्रुवपदा-नुसार केलेल्या कडव्यांची रचना ही निर्मितीपेक्षां कारागिरीलाच प्राधान्य देऊं लागते. एखाद्या तरल अनुभवाला अपरिहार्य असा सौंदर्याकार धारण करूं न देतां कवि तो अनुभव उपमा–उत्प्रेक्षा-दृष्टांत वापरून हरदासी पद्धतीनें समजावून देऊं लागतो.

कुठल्याहि गतिमान् अनुभवाचें स्पष्टीकरण करतांच येणार नाहीं. त्या अनुभवाचें स्पंदन जाणवून देणें हेंच महत्त्वाचें आहे. काव्यरूप घेणारा

अनुभव शब्द, प्रतिमा, ध्वनि यांच्यापासून वेगळा करतां येत नाहीं. फांदींत रसरसणारें चैतन्य पान, फूल होऊन बाहेर फुटावें तसे या अनुभवांतून शब्द, प्रतिमा बाहेर फुटतात. निर्मितीच्या या प्रक्रियेंत, या त्रिपुटींतली एकात्मता माझ्या प्रत्ययाला आली. एका निराळ्या अर्थानें 'सांडिली त्रिपुटी, दीप उजळला घटीं' अशी ही प्रक्रिया होती. जगत असतांना संवेदनेच्या कक्षेंत एका विशिष्ट क्षणीं येणारा अनुभव मला झपाटूं लागला. त्याचें सूक्ष्म, सखोल स्वरूप माझ्या मनाचा वेध घेऊं लागलें. त्याच्यांत आणि माझ्यांत जणुं सुसंवादाचें नातें होतें. भूगर्भांत रुजलेलीं मुळें खोल पसरत जाऊन चैतन्य शोषून घेतात त्याप्रमाणें तो अनुभव माझ्या अन्तर्मनांत खोल पसरूं लागला; कांहीं तरी शोषून घेऊं लागला. त्या अनुभवांत आपोआप कांहीं तरी 'जमत' होतें; अंतर्गत अशी सुव्यवस्था निर्माण करण्यासाठीं त्यांतले कण आणि क्षण धडपडत होते. या धडपडीला तिचा असा एक ताल होता, खास तिचें असें संगीत होतें—तिचा असा आत्मा होता :

*बुडतच जाणिव होती,*
*अनुभूतीच्या संथ गहन डोहांत :*
*अचल समाधिंत होतें जेथें स्थिरावलेलें पाणी*
*वारा बोलत नव्हता*
*नव्हती हालत पानें*
*आणि स्तब्धता होती*
*आर्त पापणीपरी पसरली पाण्यावर हलकेच...*
*शिशिरामधल्या गूढ पहाटे जैसा*
*समुद्र जावा धुक्यांत पार बुडून*
*तसेच होते बुडले*
*स्वतःच्याच गूढतेंत क्षण ते सारे...*

अशीच कांहींशी ती गूढ प्रक्रिया होती. तर्काची नजर तिथें पोहोंचत नव्हती. पृथक्करणाची भाषा तिथें जणुं व्यर्थ होती. आधीं कुठलें कडवें करायचें, मग कुठलें रचायचें, असाहि प्रश्न पूर्वीप्रमाणें निर्माण होत

नव्हता. माझ्या नव्या अनुभवाला ही कवितेची घडण (structure) मानवणें शक्य नव्हतें. याचें कारणच असें होतें कीं माझ्या अनुभवाचें, हा अनुभव साकार करणाऱ्या संवेदनांचें स्वरूप एकेरी राहिलें नव्हतें. एका अनुभवाचे अनेक अनुभवांशीं असलेले भावनात्मक संबंध मला जाणवूं लागलेले होते. ऐंद्रिय संवेदनांच्या बाबतींतहि असाच प्रकार मला जाणवला होता :

*थेंब स्पर्शतां पानाच्या हिरव्या टोकाला*
*उठूं लागल्या होत्या माझ्या नसानसांतुन*
*तुरट...गोड...पोपटी झिणझिण्या*

अशा तऱ्हेनें वेगवेगळ्या ऐंद्रिय संवेदना जाणिवेची एखादी छटा व्यक्त करण्यासाठीं एकात्म होऊन येतात—कांहीं एक वेगळ्या प्रकारची संगति साधून येतात. स्वाभाविकच, एखादा अनुभव इतर अनुभवांशीं असलेल्या त्याच्या संबंधांसकट व्यक्त झाला नाहीं तर खऱ्याखुऱ्या अर्थानें त्याची अभिव्यक्ति साधली असें म्हणतां येणार नाहीं. अशा तऱ्हेचा अनेक-संबंधात्मक अनुभव ध्रुवपदप्रधान कवितेंतून साकार होत नाहीं असें मला आढळून आलें. 'थेंब' या माझ्या कवितेंत थेंब ही एक प्रतिमा आहे. त्यांत कसलेंहि तात्त्विक भाष्य नाहीं; स्पष्टीकरण नाहीं. थेंबाची प्रतिमा साकार होण्यांतच त्या कवितेचें साफल्य आहे. या प्रतिमेहून त्यांतला आशय वेगळा नाहीं. ती प्रतिमा जाणवणें म्हणजेच तो आशय जाणवणें.

काव्यनिर्मितीच्या अशा अवस्थेंत कुठल्याहि बाह्य तंत्रानुसार लेखन होत नाहीं. प्रत्येक अनुभवाचें स्वतंत्र असें 'व्यक्तित्व' असतें; आणि या व्यक्तित्वाच्या अनुरोधानेंच अभिव्यक्तीचें तंत्र ठरत असतें. कविता 'कशी' लिहावी हें आधीं ठरवणेंच शक्य नसतें: कारण निर्मितीच्या गतिमान् अशा प्रक्रियेंत तें आपोआपच ठरत असतें. आणि म्हणूनच एका कवितेचें तंत्र हें दुसऱ्या कवितेसारखें असत नाहीं. वेगवेगळ्या स्तरांवरचे अनुभव वेगवेगळ्या तऱ्हेनें व्यक्त होतात.

निसर्ग आणि प्रेम यांविषयींचे माझे अनुभव माझ्या आजपर्यंतच्या

कवितांत प्रामुख्यानें व्यक्त झाले आहेत. निसर्ग हा माझ्या अनुभवसृष्टीचा अगदीं अपरिहार्य असा भाग आहे असें म्हटलें तरीं चालेल. निसर्गातल्या प्रतिमा अभावितपणें आणि अपरिहार्यपणें माझ्या अनुभूतीचें माध्यम बनतात. माझ्या अनुभवांच्या स्पंदनाचा अगदीं सहज असा सुसंवाद निसर्गाशीं साधला जातो. आणि म्हणूनच केवळ एखादें फोटोसारखें चित्र रेखाटावें या हेतूनें मी माझ्या कवितेंतून सहसा निसर्ग चितारीत नाहीं. व्यक्त होऊं पहाणारा माझा अनुभव निसर्गप्रतिमांशीं एकवट झालेला असतो :

*संथ निळें हें पाणी*
*वर शुक्राचा तारा*
*कुरळ्या लहरींमधुनी*
*शीळ घालितो वारा*

या ओळी जेव्हां मी लिहितों तेव्हां संथ निळें पाणी आणि शुक्राचा तारा नुसत्या सूचक प्रतिमा असतात. मनांतल्या गूढ संथ निःशब्दतेंत उमलणारा 'सृजनाचा क्षण' मला व्यक्त करायचा असतो. संथ निळ्या पाण्यावरचा शुक्राचा तारा मनांत उमलणाऱ्या त्या शुभ्र क्षणाची प्रतिमा असतो. माझ्या बहुतेक निसर्गकवितांची प्रक्रिया अशीच आहे. त्यांतला निसर्ग माझ्या अनुभवांपासून वेगळा नाहीं—वेगळा करतां येणार नाहीं. आणि म्हणूनच माझ्या बऱ्याचशा निसर्गकविता डोळ्यांसमोर 'चित्र' उभें करीत नाहींत. तसा माझा हेतूच नसतो. कवितेंतल्या निसर्गप्रतिमांचा परिणाम 'मूड' निर्माण करण्यांत व्हावा, चित्र नव्हे, अशीच माझी इच्छा असते.

*आज ही भाद्रपदांतिल रात*
*पर्णांचें भिजलेलें कंपन भिसळे अंधारांत*

असें मी लिहितों तेव्हां निसर्गातल्याच प्रतिमा मी वापरीत असतों; परंतु भाद्रपदांतील त्या रात्रीच्या अंधारांत पर्णांचें भिजलेलें कंपन डोळ्यांसमोर उभें करणें शक्य नसतें. तीव्र संवेदनेनें तें हलकेंच टिपून घ्यावें लागतें.

काव्यनिर्मितीच्या प्रक्रियेचा मागोवा घेत आजपर्यंतच्या माझ्या साधनेचें स्वरूप समजून घेण्याचा मीं प्रयत्न केला आहे. या प्रवासांतल्या अनेक मर्यादांची मला जाणीव आहे. अजूनहि अधूनमधून मी शब्दांच्या 'नादीं' लागतों. विशिष्ट तऱ्हेच्या शब्दयोजनेनें जर नादमाधुर्य साधत असेल अथवा एखादी दिपवणारी कल्पना-चमत्कृति निर्माण होत असेल तर माझी कविता आशयाशीं, माझ्या मूळ अनुभवाशीं बेइमान झाली तरी मी कधींकधीं तिची गय करतों. कांहीं कांहीं शब्दांच्या आणि प्रतिमांच्या तर मी इतका प्रेमांत पडतों कीं त्यांची अनेक वेळां झालेली पुनरुक्तीहि मी चालवून नेतों. अनुभवांच्या किंवा 'मूड'च्या बाबतींतहि असेंच होतें. एका विशिष्ट मर्यादेच्या बाहेर माझी कविता अजून फारशी गेलेली नाहीं. आंकड्यांचा एक चौकोन असतो. त्या चौकोनाच्या प्रत्येक घरांत आंकडे वेगवेगळे असतात; परंतु कुठूनहि त्यांची बेरीज केली तरी ती सारखीच भरते. माझ्या बऱ्याच कवितांचें असें होतें; त्यांची मांडणी वेगळी असली तरी त्यांचा 'मूड' एकच असतो.

मनाला सुरक्षिततेचा जबरदस्त हव्यास असतो. जें कालपर्यंतच्या तपश्चर्येनें साधलें, जमून गेलें, त्या सर्व लकबींवर मनाची हुकमत असते. परीघांत फिरण्यांत मनाला यशाची खात्री वाटते. आणि म्हणून नवा अनुभव नव्या तऱ्हेनें व्यक्त करण्यासाठीं जो धोका (risk) पत्करावा लागतो तो पत्करण्यास मन सहसा धजत नाहीं, तयार होत नाहीं. या नव्या प्रयोगांत यश येईलच कशावरून? आणि कालपर्यंत स्तुति करणारा वाचकवर्ग टिकून राहीलच असा भरवसा कोणी द्यावा? अशीं अनेक शंकांचीं भुतें मन निर्माण करीत असतें. सुरक्षिततेच्या उबदार कोशांत गुरफटलेल्या मनाला प्रामाणिक अभिव्यक्तीपेक्षां लौकिक यश अधिक महत्त्वाचें वाटूं लागतें : आणि याच क्षणीं कविता निर्जीव होऊं लागते; भावनेवर, अनुभवांवर शब्दांचे सांचे स्वार होऊन बसतात.

या सर्व गोष्टींची मला जाणीव आहे. माझ्या मनांत खोल दडून बसलेला 'जिप्सी' अशा क्षणीं विलक्षण अस्वस्थ होतो. त्याच्या अस्वस्थतेनें सुरक्षिततेला, सुस्थिरतेला तडा जातो. संकेतांच्या चार भिंतींचा

पहारा चुकवून त्याचा आत्मा दूर उडतो :

*घर असूनहि आतां घर उरलेलें नाहीं*
*चार भिंतींची जिप्सीला ओढ राहिलेली नाहीं*
*कुणी सांगावें ? असेल पूर्वजन्मींचा हा शाप*
*घडी सुस्थिरपणाची विसकटे आपोआप*
*कुणी तरी साद घाली निळ्या अनंतामधून*
*एक जिप्सी आहे माझ्या खोल मनांत दडून !*

मनांतल्या या भटक्या, उनाड जिप्सीचें भविष्य वर्तवणार तरी कोण आणि कसें ?

मंगेश पाडगांवकर

## अनुक्रम


| | |
|---|---|
| छोरी | १ |
| धोबीघाट | ४ |
| पंख | ५ |
| तुझ्यासारखें फक्त असावें | ६ |
| जाग | ७ |
| वाट | ९ |
| क्षितिज सुगंधाचें तूं | १० |
| दोघें | ११ |
| अनोळखी | १२ |
| मलाच नकळत | १३ |
| आठवणीच्या जुन्या पुलावर | १४ |
| अजून | १५ |
| नव्हतें कळलें | १६ |
| असें मोकळें हसल्यावर तूं | १७ |
| आणि मनाच्या क्षितिजाच्या रेषेशीं | १८ |
| तेव्हांपासून | १९ |
| ओळख | २० |
| सुरंगा | २१ |
| आहे त्याहुन | २२ |
| रहस्य | २३ |
| तुला मलाही जाणिव नसतां | २४ |
| स्तब्ध | २५ |
| अभिलाषा | २६ |
| थांबली न रात्र मुळीं | २८ |
| उत्तर | ३० |
| मत्स्यगंधा | ३१ |
| धुकें मनांतिल फसवें नेतें | ३२ |
| श्वासांमधली उधळुन भरती | ३४ |
| शोध | ३५ |

इथें ३९
मांजर ४०
पिवळ्या पिवळ्या फिकट प्रकाशीं ४१
झाड ४२
खार ४३
एवढेंच ४४
अचुक तुला ठाउक असतें ४५
अशा सकाळीं ४७
इच्छा ४८
इंद्रधनु ४९
उन्मनी ५०
मी जगतों ५१
शल्य ५२
आणिक कांहीं ५३
सत्य ५५
विसरायाचें म्हणशिल जितुकें ५७
स्पर्श ५९
असंभवाचा देठ तुटेना ६०
सोहळा ६१
तूं असतांना ६२
पानमोकळें ६३
काळोखांतुन दोन क्षणांना ६५
डंख ६६
ते गाणारे डोळे ६७
गिरकी ६९
हृदय तुझें ७२
तुला पाहिलें मीं हसतांना ७३
मनांत ओल्या तृप्त सावल्या ७५
वज्रपुरुष ७६
पुन्हा एकदां ७८
झाडच होतें श्रावण ८०

# छोरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २१७१३ वि: ३।८५
क्रमांक ७३५०२ नों: दि: २५।

थबकुनि थोडी
वळुनि पुढें घाईनें
प्रौढ नि बुटक्या झाडाजवळुन जास्वंदीच्या
जाते वाट पुढें ही शाळेपाशीं ...

शाळा :
चौकोनी खोकेंच चार खिडक्यांचें
रंग सफेत चुन्याचा
छप्पर लाल नळयांचें...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८४९२

भल्या पहांटे (आठ वाजतां)
झाडांचीही नसते जेव्हां झोप संपली
सुरू व्हायची शाळा...
पहिली घंटा...
दुसरी घंटा...
सुरू प्रार्थना आणिक नंतर :
"नमण तुला गनराया
बुद्धि जागृती देइ मुलां या."
...एक जांभई !

कर्कश आवाजानें नंतर हुकुम व्हायचा :
"काढा पाट्या
कुठें उजळणी
चला दाखवा..."

...माझी पाटी कोरी...
हात पुढें...
भिंगें खवचट चष्म्याचीं रोखुनियां बवती
वेत सपासप माझ्या हातांवरतीं...

किती वेळ मुसमुसून रडलों नाहीं ठाउक
आली अवचित जाग स्पर्शतां हात मऊ
मीं पाहियलें शेजारीं:
नवीन कोणी मुलगी
केस भुरे सोनेरी...
निळसर डोळे...

मीं विचारलें तिज, "नांव तुझें..."
ती खट्याळ हसली आणि म्हणाली,
"नांव? छोरी...हात पुढें कर."
नजर खोडकर
आणिक माझ्या हातावरतीं...दुखऱ्या हातावरतीं
चिमणीच्या नाजुक दातांनीं तोडियली
फोड एक कैरीची...

फोड एक कैरीची:
अजून ताजी
जिभेवर जिची आंबट गोडी,
अजून स्वप्नीं
भुरभुरती सोनेरी कुंतल,

अजून घेते टिपुनि वेदना
नजर तिची ती निळी खोडकर...
गिरकी घेते मनीं कलाबुत तिच्या स्वरांची :
" नांव ? छोरी... हात पुढें कर. "

१०-१०-५३

## धोबीघाट

ही पानांची
हिरवी जाळी
पलिकडलें
आकाश निळें...

पुढें जरासा
धोबिघाट
सुस्तींत विसावे
खांद्यावर
झुलती बगळे.

१९५३

## पंख

मलाच न कळत
अवचित कांहीं घडतें ;
शब्दांना भोंवळ येते
अन् जाणवलेलें
निःशब्दांतच दडतें

ध्यानीं मनीं पण नसतां
कधीं अचानक,
स्फुरती...फुटती
सुप्त मनांतिल सुरवंटाला
इंद्रधनूचे पंख !!

१९५३

# तुझ्यासारखें फक्त असावें

जसें फुलावें फूल तशी तूं
उगिच उमलसी...गंध उधळसी
मनांतल्या गहिऱ्या तृप्तीच्या
चांदण्यांत न्हाऊन निथळसी

तुला असें फुललेंच पाहिजे
तुला न जाणिव या फुलण्याची
हें न तुझ्यास्तव, वा माझ्यास्तव :
केवळ खूण तुझ्या असण्याची !

कार्तिकांतल्या धूसरतेला
जसें चांदणें हळुच शिवावें
तसेंच तूंही उगिच...अकारण
मलाच नकळत मनांत यावें

मनांत यावें आणि सरावी
सारी धडपड ; शब्द विरावे !
आणिक उरमीं निःशब्दाच्या
तुझ्यासारखें फक्त असावें ! !

२९-११-५३

## जाग

कां असें वाटलें होतें
तूं असशिल वादळवारा ?
उधळशील साऱ्या वृत्ती
श्वासांनीं सैरावैरा ?

वाटलें स्पर्श होतांच
थरथरेल हें आकाश
ढाळतील पानें झाडें
होउनियां मूक...हताश !

मीं मिटुनि घेतले डोळे
पण शांत निगूढच सारें
तंद्रींत कांपऱ्या हळव्या
अन् होते वाहत वारे !

काजवा एक अंधारीं
शोधीत भिरभिरे कांहीं
ती उघडमीट चमचमती
अन् दुसरें कांहीं नाहीं

भुरभुरे दूर कोठेंसा
बांसरिचा उत्कट सूर
वेलीपरि लवली होती
नदितीरावर हुरहूर !

सर्वस्व लपेटित माझें
तो सूर थरथरे भंवतीं
ही अशी क्षणीं जागृतिच्या
कधिं शुद्ध हरपली नव्हती !

...मज जाग पहांटे आली
झिळमिळत्या तरल प्रकाशीं
तृप्तीनें लवलें होतें
आकाश संथ क्षितिजाशीं

२२-१२-५३

# वाट

पाण्याच्या कांठाशीं फांदी झुकलेली
वाट तुझ्यामाझ्यापरि वाटच चुकलेली
हिरव्या गवतांत फुलें झुलती बाजूला
पाण्यावर फांदीच्या सावलिचा झूला

चुकवुनियां वाट तुझी आलिस तूं येथें
आणि निराळीच मुळीं झालिस तूं येथें
तूं न तुझी उरलिस...अन् वेढिलें मला तूं
थरथरत्या खोल जळीं ओढिलें मला तूं

पाण्याच्या कांठाशीं फांदी झुकलेली
वाट तुझ्यामाझ्यापरि वाटच चुकलेली

२८-१२-५३

# क्षितिज सुगंधाचें तूं

पहिली सर ओसरल्यावर...
विरघळतें जेव्हां गगनधरेंतिल धूसर अंतर
भिजलेली माती गंधवती उत्सुकते
ओथंबुनि आकाशहि लवतें...झुकतें
आकाश...
धरा...
दुवा सुगंधाचा तूं त्यांच्यामधला

पहिली सर ओसरल्यावर
भुरभुरतें जेव्हां मनांत कांहीं धूसर
तें निराकार
आकाश होउनी मनांत झुकतें;
आकारास्तव
तळमळतें उत्सुकतें;
थरथरणाऱ्या आतुरतेचा
तूं त्यांच्यांतिल सेतू:
पार्थिव आणि अपार्थिव यांच्यामधलें
झिळमिळणारें क्षितिज सुगंधाचें तूं

११-६-५४

## दोघें

संथ समुद्राच्या
चुरगळलेल्या हिरव्या लाटा ;
आणि चुंबनोत्सुक अधरांपरि
उत्कट अधिरें आकाश ;
पिवळ्या...सोनेरी चंद्राचा
झिरझिर...मऊ प्रकाश ;
पुळणीवर न्हालेली...न्हालेली
भुसभुशीत ओली रेती ;
भवतींभवतीं फिकट भुरा अंधार
आणिक
मी...तूं

२२-६-५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्रम २१९९३ वि. ३/८५
क्रमांक ९३५८२ नों: दि: २५/५५

## अनोळखी

निराळेच ते हटणारे
तूं न तसा; वेगळाच तूं
अदय तुझ्या आवेगानें
उधळतोस लपले हेतू

उधळतोस लपले हेतू
आणि पुन्हां वेगळाच तूं;
अनोळखी मी माझ्याशीं
अनोळखी माझे हेतू!

काय हवें होतें मजला?
धुक्यापरी मी थरथरतें;
मी माझ्या...माझ्याच जगीं
अनोळखी...परकी उरतें

२५-६-५४

## मलाच नकळत

तुझ्या प्रीतिची
तूं नव्हती केलीस सांखळी
गाढ क्षणीं त्या
मिटुनी हें आकाश घेतलें पापण्यांत तूं
ज्यांत होउनी
एक चांदणी
मी लुकलुकलों
अन् अनुभवली
असण्यामधली अथांगता मीं !

आज पाहतों—
स्पर्श तुझा तो
अन् शब्दांच्या पलिकडली तूं
फूलपांखरें होती या सर्वांचीं :
मलाच नकळत
फूल होउनी अन् फुलतों मी
त्यांच्यासाठीं...

२५-६-५४

# आठवणीच्या जुन्या पुलावर

आठवणीच्या जुन्या पुलावर
फडफडणारा एक पारवा
जळांत हिरवें फिक्कट वर्तुळ
झुरणारा कांपरा गारवा

आठवणीच्या जुन्या पुलावर
उदास डोळे व्याकुळलेले
ती स्पर्शाची थरथर भाषा
दोन हात क्षणभर जुळलेले

आठवणीच्या जुन्या पुलावर
काळोखांतच बुडलेलें·जग
दूर दिव्यांचीं लुकलुक टिंबें
अन् शब्द न फुटलेली तगमग

१७-७-५४

# अजून

रात्रीं झडलेल्या धारांची
ओल अजूनहि अंधारावर
निजेंत अजुनी खांब विजेचा
अुरकी गुंगी अन् तारांवर

भित्र्या चिमणीपरी, ढगांच्या
वळचणींत मिणमिणे चांदणी
मळक्या कांचेवरी धुक्याच्या
वाऱ्याची उमटली पापणी

कौलावरुनी थेंब ओघळे
हळुच, सांचल्या पाण्यावरतीं ;
थेंब ध्वनीचा हवेंत झुलतो
गिरकी घेउन टांचेवरतीं

गहिऱ्या ओल्या कुंदपणांतच
गुरफटलेली अजुन स्तब्धता
कबूतराच्या पंखापरि अन्
राखी...कबरी ही अंधुकता

अजून आहे रात्र थोडिशी,
असेल अधिकहि···कुणि सांगावें ?
अर्धी जाग नि अर्धी निद्रा
इथेंच अलगद असें तरावें !

३०-७-५४

## नव्हतें कळलें

नव्हतेंच मलाही माहित मी
कां दिलें असें उधळून मला
लाटेपरि डोळे मिटलेल्या...
त्या अंधपणांतच खोल निळया!

विझलेले होते तर्कांचे
ते झगमगणारे तीक्ष्ण दिवे;
मी होतों : तुटलेले होते
'कां' आणि 'कसें'चे क्षीण दुवे!

मी होतों अन् जीवन होतें
नव्हती चाकोरी जगण्याची
मी होतों अनुभव केवळ तो
नुसती धुंदी कोसळण्याची!

जें हवेंहवें असतें अगदीं
लाभलें असेलहि तेंच मला :
तें बांधुं कसें? कळलें नव्हतें
कां उधळुनि मीं दिधलें मजला!!

३०-७-५४

# असें मोकळें हसल्यावर तूं

बर्फालाही सुचतात फुलें
असें मोकळें हसल्यावर तूं
सूर होउनी आणि उमटती
कळकांतुन वाऱ्याचे हेतू

असें मोकळें हसल्यावर तूं
थबकतात क्षण शरदामधल्या
धुतलेल्या आकाशावरतीं
बटा उन्हाच्या भुरभुरणाऱ्या

असें मोकळें हसल्यावर तूं
कबूतरें डोळ्यांतील उधळुन
ओळखिचें सलगीचें बनतें
आकाशहि परकेंपण विसरुन !

असें मोकळें हसल्यावर तूं
जें न तुझ्याहुन दुजें...वेगळें
दिल्या-घेतल्यावांचुन कांहीं
तुलामलाही मिळतें सगळें

३-८-५४

# आणि मनाच्या क्षितिजाच्या रेषेशीं

झाड सुरूचें टिपतें आहे
रंध्रारंध्रामधून गाणें वाऱ्याचें
आणि पलिकडे
गाढ निळें आकाश
दूर पसरलें...
ज्यावर ठिपका एकच शुभ्र ढगाचा...
पाण्याची खळखळ
फेसानें भरलेली...
मान कलवुनी थोडी
पडली आहे होडी
संथपणानें...
तिरप्या संथपणानें...

या रंगांतुन...तंद्रींतुन...ठिपक्याटिंबांतुन
या साऱ्या कलत्या तिरप्या रेषांतुन
तूंच तूंच जुळतेस मनांतुन
सर्वत्र विखुरलें...सर्वत्र उधळिलें
कांहीं तरि आहेच तुझेंपण;
या पाण्यावरची
निळसर थरथर गती होउनी तूंच वाहसी
कुजबुजसी कांहीं गूढपणें तूं
आणि मनाच्या क्षितिजाच्या रेषेशीं :
दूरदूरच्या क्षितिजाच्या रेषेशीं

१३-८-५४

# तेव्हांपासुन

श्रावणाचिया
ओल्या चिंब उन्हांतुन तूं
आली होतिस ;
कॅशीओच्या
पिवळयाजर्द फुलांतुन तूं
हसली होतिस !

कातरलेल्या
कवडशांचिया जगांत तूं
होतें नेलें ;
अन् पाण्याशीं
करीत चाळा बोटांनीं
चेटुक केलें !

तेव्हांपासुन
कॅशीओला बहर सदांचा
तेव्हांपासुन
मनांत श्रावण चिंब उन्हाचा

१३-८-५४

# ओळख

पळसफुलांच्या लाल ओंजळी
भरल्या होत्या
पिवळयाजर्द उन्हानें
पाण्यावरतीं
शुभ्र ढगाच्या प्रतिबिंबाचा बगळा
पंख फुलारुन
होता नितळ तरंगत
तेव्हांची ती पहिली ओळख अपुली !

बोलायाचें खूपच होतें
तुला मलाहि ;
शब्दांच्या पाण्यांत पसरल्या
दाट निळें आकाश होउनी
भिनायचें होतें
उत्कट धुंदपणें दोघांनाही...

परंतु जेव्हां
मौनानें मौनच धरिलें हृदयाशीं ;
अन् शब्दांचीं झालीं पळसफुलें
पिवळयाजर्द उन्हानें भरलेलीं...

१६-८-५४

## सुरंगा

लाल साडिला किनार पिवळी
फुलाफुलांचा तुझा पोलका
आंगठींतला खडा किरमिजी
शब्दांहुनिही अधिक बोलका

लालचुटुक ओठांत स्मिताचें
फूलपांखरूं मिस्किल···झुलतें,
बूट उंच टांचेचे : त्यांची
मिजास तिरपी अधिकच खुलते

निळया, केशरी, तांबुस, पिवळया
रानफुलांचा घोंस कुंतलीं :
फिरायचें विसरुन वाऱ्याचीं
झुळझुळ बोटें त्यांत गुंतलीं

फूल-तुऱ्यापरि मिरवित जासी
या वाटेनें नवथर तोरा
मी माझ्याशीं उगीच हसतों,
उगीच होतों गोरामोरा !

२६-८-५४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८४१३
शाखा (स्थळ प्रत)

# आहे त्याहुन

अंधार जरासा
गडद हवा होता
आहे त्याहुन...

वाऱ्याची शीळ जरा
हळुवार हवी होती
आहे त्याहुन...

वाट नागमोडीची
भिरकींत हवी होती
आहे त्याहुन...

पाण्यामधला पारा
आर्त हवा होता
आहे त्याहुन...

संकोच जरासा
फिका हवा होता
आहे त्याहुन...

...तूंही अधिक जरा
जवळ हवी होतिस
आहे त्याहुन...

१०-९-५४

# रहस्य

कुजबुजतां तूं
त्या अंधारीं
ऊन ऊन श्वासांची घालुन नाजुक फुंकर
शब्दांच्या हळुवार पापण्यांवरतीं
रहस्य कळलें मजला :

शब्दहि दिसती :
थेंबांच्या इवल्या मनांतल्या
इंद्रधनूच्या फुलासारखे...

शब्दांचा स्पर्शहि जाणवतो :
श्रावणांतल्या मधेंच उडुनी जाणाऱ्या
चतुर-उन्हाच्या
मऊ रेशमी पिसांसारखा...

शब्दांनाही सुगंध असतो :
आषाढाच्या
तृप्त ओलसर कुंद...धुंद निश्वासांचा

कुजबुजतां तूं
त्या अंधारीं
रहस्य कळलें :
शब्दांना नसला अर्थ तरीही
कळतें सारें :
कळण्याच्याही पलिकडलें

१०-९-५४

## तुलामलाही जाणिव नसतां

तुलामलाही जाणिव नसतां
अशी अचानक गांठ पडावी
अन् दडलेली रात्र मनांतिल
चांदण्यांत निथळत्या बुडावी...

जपला तरिही उडून जावा
पाऱ्याचा क्षण—क्षणभर खळबळ...
आणि लवावी श्रांत पापणी
हलके स्पर्शित काळें वर्तुळ

तुलामलाही जाणिव नसतां
उडुनि मनांतिल रानकबूतर
प्रश्नाच्या डोहांत शिरावें
शोधाया रूसलेलें उत्तर

कळूनही...कांहीं न कळावें
शब्दांचा हरवावा आशय
डोहाभवतीं घोटाळावें
रानकबूतर आणि निराश्रय !

१५-९-५४

## स्तब्ध

जेव्हां कधीं हरवते
दोन सुरांतिल
ओळखिची जवळिक;
दोघांनाही खुपतें
परकेंपण आणि अचानक...

जेव्हां कधीं हरवतें
दोन क्षणांतिल नातें
अन् शब्दांच्या मनांतलें
सोनेरी ऊनहि
क्षीण बनुनि काजळतें...

तेव्हां तूं स्तब्ध रहा
अनुभवीत
दोन क्षणांमधलें—
कालातीत सुनेंपण...
तेव्हां तूं
स्तब्ध रहा
दोन सुरांमधलें
अपरिमेय होऊन मुकेंपण

२२-९-५४

## अभिलाषा

अभिलाषा ही
कधिं ग्रीष्मांतिल मातीच्या ओठांनीं
पिऊन घेते आषाढाच्या ओठांमधलें
उत्सुक काळें वादळ आसक्तीचें...
आणि पांघरुन
मऊ ओलसर ग्लानी
पडून असते
वक्षावरच्या क्लांत टेकड्यांऐसी!!

अभिलाषा ही
केस सोडुनी ओलेते छायांचे
विवस्त्र पिवळें ऊन होउनी बसते
पाय सोडुनी जळांत लोभस काळ्या—
कांठावरच्या पांगाऱ्याचें जेव्हां
होतें रक्त अनावर
दणकट काळ्या कांटेरी फांद्यांतुन फुटतो
आणिक लाल धुमारा!!

अभिलाषा ही
त्या तसल्या अंधारीं
निमूळत्या बोटांतिल होते
ठिणग्या लाल विजेच्या...

अभिलाषा ही
वाऱ्याच्या हाताला जाणवणारा
पावसांत भिजलेल्या
झाडाच्या सालीचा
खरखरीत ओला स्पर्श...!

अभिलाषा ही
रुजते जाउन खोलखोल मातीच्या पोटीं :
ऊष्ण ओलसर अंधाराला
रोमांच जिथें फुटती
हिरव्या तृप्त विजेचे
आणि अचानक होते
हिरवी हिरवी माती
आणि अचानक
पानांच्या ओठांवर रुळतें
उत्कट पिवळ्या रानफुलांचें गाणें

२४-९-५४

## थांबली न रात्र मुळीं

तूं म्हटलें थांब तरी
थांबली न रात्र मुळीं...
अनोळखी देशांतिल
अनोळखी पक्ष्यापरि !
ओझरत्या ओळखिचें पुसट पीस
झुरत आणि रेंगाळत
केवळ मागें उरलें...

तूं म्हटलें थांब तरी
थांबली न रात्र मुळीं...
जाणवली फुटतांना
कांच धुक्याची हळवी
अन् दिसला त्यांतूनच, विसकटल्या
गडद रंगचित्रांचा
गूढ जपानी पंखा
क्षितिजावर उलगडला...
...तोही विरण्यासाठीं

तूं म्हटलें थांब तरी
थांबली न रात्र मुळीं
आणि स्वप्न-यमुनेच्या पाण्यानें भरलेला
रात्रीच्या निद्रेचा घट नाजुक
रिक्त पुन्हा जाणवला
झाडांच्या गौळणिही
तिमिराच्या ओढणींत लपलेल्या
कळलें नव्हत्याच मुळीं !

कळलें दोघांनाही
झाडें झाडें होतीं
जून राठ फांद्यांचीं
अन् हिरव्या पानांचीं :
पिकुनी गळण्यासाठीं फुटलेल्या

२३-१०-५४

## उत्तर

पंख असूनहि मुळीं न उडतें
आकाशाचें निळें कबूतर...
तसें तिच्या ओठांतच बसतें
अडून तें हटवादी उत्तर !

तिचिया भाळीं होडनिया बट
प्रश्नहि माझा खटयाळ रुळतो
किती सारिला मागें तरिही
पुन्हां पुन्हां तो तिलाच छळतो !

फितूर झाले ओठ नि डोळे
मनांत हें ती पुरें जाणते ;
आषाढांतिल प्रौढ सरीची
तरीहि उसनी ऐट आणते !

कधितरि पडते गांठ अचानक
दोघेंहि अडखळतों, अडतों...
...हिरव्या कुरणावरुन मनाच्या
गात उन्हाचा पक्षी उडतो...!

ती हसते...पण हसतच नाहीं
अधिकच होतें घुमें कबूतर
आणि उन्हाचा पक्षी नेतो
चोचींतुनि पळवुनिया उत्तर

१४-१०-५४

# मत्स्यगंधा

पाऱ्याची मासळी लोचनीं
पापणिच्या जाळ्यांत न मिळते ;
नाकामधली सैल सुंकली
प्रकाश मिचकावित झिळमिळते !

दर्यापरि बेपर्वा दृष्टी
श्वासांत तिच्या खारा वारा
छातीवर मिस्कील धिटाई
माथ्यावर मासळिचा हारा

धगधगणारें ऊनहि झालें
भर माध्यान्हीं मऊ चांदणें ;
झिगझिगली पाण्यांत कलाबुत
अडखळले लाटांत तराणे !

पराशरापरि चळला वारा
मागुं नये तें अन् मागितलें :
योजनगंधेच्या ओठांवर
संमतिचें इंद्रधनू झुललें !

१९-१०-५४

# धुकें मनांतिल फसवें नेतें

धुकें मनांतिल फसवें नेतें
करून कांहीं विचित्र चेटुक
उनाड वाऱ्याच्या वाटेनें
काळ्या काळ्या डोहाकांठीं...

जिथें संपती
फिकट उन्हाचीं
लांब निमुळतीं अगतिक बोटें ;
जिथून दिसते
काळ्या काळ्या डोहांमधली
थरथर कातर वलयांची ती
हळवी गिचमिड!!

धुकें मनांतिल फसवें नेतें
मला न ठाऊक...कशास? कोठें?
अतृप्तीच्या उंच कड्यावर...
गूढ क्षणीं त्या
डोळयांतिल बाहुल्यांत जन्मे
अफाट धाडस!!
आणि पांखरूं
अस्तित्वाचें स्वतःस देतें
खुशाल झोकुन
उंचावरुनी खोल...दूरवर
आणिक त्याची इवली छाया
लांब उन्हाच्या दोरावरुनी घेते झोका

येते स्पर्शुनि पाय आपुले
मरणाच्या दगडी ओठांना !!

धुकें मनांतिल फसवें नेतें
काळोखाच्या खोल गुहांतुन
जिथें गवसती निद्रित शिल्पें...
...अर्थ जयांचा मुळीं न लागे !
बडबडणाऱ्या वाऱ्याचाही आत्मा जेथें
अबोल होतो...
आणि दूरच्या अंधाराच्या जुनाट वृक्षावरतीं
वेल काजव्यांची चमचमते...अन् मावळते
झुकलेलें आकाश सांगतें
अधिकच वाकुनि रहस्य कांहीं :
थिजलेल्या पाण्यास परंतू
कळे न भाषा
त्याच्या डोळयांमधली शाई गोठुनि जाते
...आणिक पाणी अधिकच थिजतें !!

३०-१०-५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ
अनुक्रम 29093 ..... दि: [illegible]
क्रमांक [illegible] ..... नों: दि: [illegible]

## श्वासांमधली उधळुन भरती

तेव्हां केलें पाप असें कीं
पुण्यहि मेचव फिकें वाटलें...
थरारला मातीचा आत्मा
कोंब जळाचे ढगांस फुटले!

खिडक्यांच्या बुजऱ्या डोळ्यांनीं
भिंत लाजरा प्रकाश प्याली
कौलाच्या सुकल्या ओठांवर
थेंबाची चांदणी उतरली

तेव्हां कळलें भिजल्यानंतर
गंधवती कां होते माती
कां भरते कुरळया गवतानें
उंच कड्याची शिसवी छाती

जगण्यामरण्याचाही तेव्हां
अर्थच बदलुन गेला अवचित
श्वासांमधली उधळुन भरती
फुटली व्यक्तित्वाची चौकट

१७-१२-५४

## शोध

भल्याभल्यांना तिनें चकविलें होतें!
फितूर होती तिजला
क्षितिजावरतीं
उलगडणारी रंगपंचमी,
फितूर होती तिजला
मुरली कृष्णाची,
आणिक तृष्णा राधेच्या डोळ्यांची!!

आसुसलेल्या डोळ्यांनीं
मीं तिला पाहिलें तेव्हां
नुकतेंच मला कळूं लागलें होतें;
उगीच वाटत होतें
अफाट माळावरुनी एकटेंच हिंडावें;
भर माध्यान्हीं
उभें रहावें झाडाखालीं काजूच्या
श्वासित पहिल्या मोहोराचा
मादक...उग्र सुगंध;
खिळवावी दृष्टी
निळ्या निसुळत्या टेकड्यांवरी;
जाणवली होती आणि अचानक
छायांच्या कुरळांतुनि आसुस फिरणाऱ्या
तरुण उन्हाच्या बोटांची आतुरता;
थेंब स्पर्शतां पानांच्या हिरव्या टोकाला
उठूं लागल्या होत्या माझ्या नसानसांतुन
तुरट...गोड पोपटी झिणझिण्या;

आणि मनांतिल वाऱ्याच्या झुळुकीला
येऊं लागली होती
मातीच्या गंधाची भोंवळ...

त्या वेळीं
तिनें व्यापिलीं होतीं माझीं स्वप्नें ;
उगीच वाटत होती ओढ तिची
...आणिक अंधुक भीती...
वाटत होतें
श्वासांची तिचिया फूलपांखरें व्हावीं,
तहानलेल्या माझ्या ओठांवरतीं
हळुच बसावीं...
परंतु नव्हता धीर मला !
तिच्याभोवतीं होतें
जननिंदेचें वर्तुळ
...असतें ज्याला भित्रें अस्तर आसक्तीचें...
तिला मुळीं नच पर्वा होती कसली :
भल्याभल्यांना तिनें चकविलें होतें
आणि चुकविलें होतें
संकेतांच्या पाटीवरचें त्रैराशिक नीतीचें...

आणि अचानक अशी एकदां सरत्या संध्याकाळीं
ती मला भेटली झाडाखालीं काजूच्या,
अगदींच अकल्पित...
कळ्या काजव्यांच्या
नुकत्या तेव्हां फुलूं लागल्या होत्या
डोह जाहला होता अंतर्मुख...

त्या दिवशीं
ती शब्दांनीं मोहरली,
शरदामधल्या स्वच्छ उन्हापरि
तिनें उधळुनी दिलें स्वतःला ;
ती बोलत होती माझ्याशीं...अपुल्याशीं...
तिनें खिळविली दृष्टी
क्षितिजावरच्या फिकट ढगाच्या संथ शिडावर
आणि म्हणाली,
"पुढच्या प्रत्येक क्षणाची ओढ मला
मला न ठाउक रूप तयाचें
मला न ठाउक दिशा ;
मनांत नाहीं चाकोरी कसलीही
त्या गूढ क्षणाच्या सीमेवरतीं उलगडणारी ;
अकल्पिताच्या वृक्षावरचा
अचानकाचा पक्षी—तो पुढचा क्षण,
विवश होते जेथें जाणिव..."

...मी स्तब्धच होतों,
हरवुनि बसलों होतों मीच मला !
वाटत होतें :
मीच जाहलों होतों तो पुढचा क्षण :
सुरवंटाला काळाच्या—
फुटुनी पंख गतीचे रंगित !
पुढचा क्षण...दिशाशून्य आकाशीं...क्षितिज हरवतें जेथें...
ज्याच्या सीमेवरतीं
कधिं न उलगडे
आंखिवरेखिव व्यक्तित्वाची चाकोरी...! !

त्यानंतर ती पुन्हां भेटली नाहीं ;
मी अबोल होउन हिंडत होतों
माळावरुनी...एकटाच...शोधित कांहीं...
वाटत होतें :
गेलेल्या प्रत्येक क्षणाचा
बनतो गज लोखंडी
आणिक होतो एक पिंजरा अस्तित्वाचा

८-२-५५

## इथें

इथें न छप्पर गिळण्या येई
खुल्या नभाचें खुलें मनोगत
इथें न भिंती परिटघडीच्या
मळविण्यास मातीचें हृद्गत !!

उनाड वळणें ही वाटांचीं
इथें गतीला गाणें सुचतें ;
अन् सावलिचें काळें पाडस
तृप्त उन्हाला मजेंत लुचतें !!

खरपुस आमंत्रण मातीचें
इथला वारा घेतो श्वासुन ;
बैरागी शिशिराचा संयम
रानफुलें देती भिरकावुन

मनांतली चाकोरी होते
उनाड येथें शाळा चुकवुन ;
आणि जिभांनीं हिरव्या, जीवन
दाखवि मरणाला वेडावुन !!

२२-१-५५

# मांजर

माझ्या बेसावध खिडकींतुन
येतें उतरुन
हळुच उन्हाचें भित्रें मांजर ;

कांचेच्या गालांना करुनी
शेपटिच्या मिस्किल टोंकानें
हळुच गुदगुल्या...
गुबगुबीत पंजांत आपुल्या
नखें लपवुनी
पडुन राहतें
सुस्तपणानें मिटून डोळे...

...अन् दाराच्या
झुलणाऱ्या पडद्याची छाया
विणूं लागते त्याच्यावरतीं
झिरझिरीत जाळीचें चेटुक...

२६-१-५७

# पिवळ्या पिवळ्या फिकट प्रकाशीं

पिवळ्या पिवळ्या फिकट प्रकाशीं
घुसमटलेली वाट वाकडी ;
सुरकुतलेलें आंबट पाणी
आणि बोळकी वृद्ध झोपडी...

पिवळ्या पिवळ्या फिकट प्रकाशीं
दमेकरी म्हातारा पिंपळ ;
क्षीण धुराच्या जखमी रेषा,
वर घारीचें यांत्रिक वर्तुळ...

पिवळ्या पिवळ्या फिकट प्रकाशीं
एक भिकारिण वखवख भटके ;
किरट्या आसक्तीचें वाघुळ
जगण्याच्या फांदीवर लटके...

पिवळा पिवळा प्रकाश फिक्कट
बघतां बघतां मनांत पसरे...
झपाटल्या डोहाशेजारीं
येउन घेरी आत्मा घसरे...

११-२-५५

# झाड

अवकाशाच्या गळयांत अडला
रुखा...कोरडा एक हुंदका :
तसें झाड हें उभें अनामिक...

बुंध्याच्या सालींत गंजल्या
विझल्या फांद्या
कुठें वाकडें सुरकुतलेंपण
उरीं घेउनी उभ्या बिचाऱ्या...

उत्तररात्रीं
वाऱ्याच्या खांद्यावर ठेवी
हात फांदिचा ;
वारा पण दचकून झटकतो
ही विचित्र...खरखरीत सलगी...

रोज पाहतों मी खिडकींतुन
मला वाटतें : मुकें झाड हें
मातीच्या धमन्यांवरचें म्हातारें ओझें ;
स्वतःच होउन भूत बैसतें
स्वतःच्याच मानगुटीवरतीं !!

२-३-५५

# खार

हवें-नकोच्या पल्याड अगदीं
जिथें चालणें मावळतें
अन् वाट संपते :
पुन्हां सुरू नच होण्यासाठीं.
तिथेंच बसते चपळ खार ती
दोन चांदण्या भिरभिर डोळ्यांमधल्या
मिचकावित,
अन् फळावरी पिकलेल्या कोरित
लवचिक गाणें,
करीत टुकटुक काळालाही !!

आणि वाटतें
मातीच्या कलशापरि कक्षा
फोडावी : उधळाव्या ठिकऱ्या ;
वाटेची तोडून सांखळी
मुक्त करावे पाय गतीचे !

...हवें-नकोच्या सीमेवरतीं
वाट सरावी :
पुन्हां सुरू नच होण्यासाठीं !
आणि फिरावा
खारीच्या शेपटिचा झुबका
आत्म्यावरुनी !!

२० ३-५५

## एवढेंच

मंद फिक्या गंधाच्या
त्या कुरळ्या रात्रींतुन केसांच्या
फिरतांना पांच पक्षि बोटांचे
स्वत:लाच हरवुनि होते बसले...

अन् न कळे
परत पुन्हां
परतले कसे अवचित
घेउनियां चोचींतुन
पांच चांदण्या बुजऱ्या...

रात्र तुझी नेलिस तूं...
पण अजुनी
बोटें हीं अपुल्याशिंच गुणगुणती—
पांच चांदण्या हलके...
एवढेंच हें माझें
एवढेंच माझ्यास्तव उरलेलें

२२-४-५५

## अचुक तुला ठाउक असतें

अचुक तुला ठाउक असतें
केसांमधल्या फूलतुऱ्याशीं
तुझ्या साडिचा रंग कोणता जुळतो ! !
लाल मातिचा
आणि निळ्या या आकाशाचा
रंगजिव्हाळा
अचुक तुला आकळतो...

अचुक तुला ठाउक असतें
तूं असतांना केव्हां माझ्या मनांत उठती
निळीं...जांभळीं...लाल...किरमिजी वीजवर्तुळें ;
तीं वीजवर्तुळें धरून हातीं तूं
घेसी माझ्या मनांत अवखळ गिरक्या :
स्वप्नांना माझ्या भोंवळ येईतों...
आणि अचानक—
थबकतेस तूं...मिटून डोळे
जेव्हां
निळें पांखरूं होउनियां
आकाश उतरतें हळूच खालीं,
आणि तुझ्या खांद्यावर बसुनी
गाउं लागतें गाणें,
अर्थ जयाचा केवळ ठाउक
तुझ्या मनांतिल रंगपऱ्यांना...

अचुक तुला ठाऊक असतें...
तूं असतांना
माझ्या असण्यामधलें
साफल्य मला आढळतें...अचानक...
आणिक माझ्या हव्यासाचीं
चपळधूर्त हीं बोटें
स्वप्नाळू बनती;
नखांतुनी उगवते
शुभ्र झग्याची मनकवडी सोनपरी...
उनाड होते माझी जाणिव,
आणि अनामिक एखाद्या पक्ष्यापरि
अनोळखी रानांतुन
जाते हिंडत...भटकत
शीळ वाजवित;
खळखळत्या वाहत्या
नागमोडि वळणावरुनी,
पुढें...पुढें...
पळसाच्या हिरव्या पानांतिल
शिलगावित लाल फुलें
पुढें...पुढें...

२९-४-५५

# अशा सकाळीं

गिरबटलेल्या डोंगररेषा
सुळसुळणारें ऊनहि तल्लख ;
मानवाकव्या माड कलंदर
एक न नारळ पुरा कफल्लक !!

चपळ हवेच्या डोक्यावरतीं
तलम धुक्याची तिरपी टोपी ;
एकसुरी आपुलीच खळखळ
ऐकत पाणी जातें झोपीं !!

पाण्यावरतीं सूर मारितो
एक शुभ्र गुबगुबीत पक्षी :
चोंच तयाची पिवळी पिवळी
पंखावरतीं काळी नक्षी !!

खुसखुशीत या अशा सकाळीं
हवीच असली गुंगी थोडी...
...या मातीचें व्हावें पाणी
अन् पायांची लहरी होडी...

३०-४-५५

## इच्छा

ऊन जरासें मनांत रुजलें
मातींतुन किणकिणल्या तारा ;
अखेर उरलें धुकें परंतु
मनांत जमला बर्फच सारा

आतुरतेचें फूलपांखरूं :
तुटले पंख नि किडाच उरला ;
तुझ्याच इच्छेनें माझ्यावर
अन् बर्फाचा कडा वसरला !!

तुझीच इच्छा : मातीवरतीं
होउनि हिरवी भुरभुरणारी ;
तुझीच इच्छा : शोषुनि पानें
हंसरी फांदी करपविणारी...!!

तुझीच इच्छा : फिरव मला तूं
येईतों जाणिवेस भोवळ :
कोंभ उन्हाचे कधिं सोनेरी,
कधीं मनावर बर्फाचे वळ !!

११-७-५५

## इंद्रधनु

ओठांनाही फुटले डोळे
तुलाच कळलें फक्त कसे ते;
तुलाच कळलें अन् कां लपले
काळोखाच्या हातांमध्यें
चिवट विजेचे भेदरलेले दोन ससे ते...

तुलाच कळलें अन् कां तेव्हां
तोडियलें...तुडविलें मला मीं
आणिक झालों नुसती माती
भिजण्यासाठीं:
नुसती माती
जिच्यांत रुतलिस खोल खोल तूं
रुजण्यासाठीं...

तुलाच कळलें कां मी झालों
भुऱ्या हवेच्या मनांतल्या त्या
तारेवरतीं वीजवाहत्या
थेंब कोवळा
इंद्रधनू घेउनियां ओठीं...

२४-७-५५

## उन्मनी

गडबड···घाई...गर्दीमध्यें
तुझी आठवण नव्हती उरली ;
मुकेच होते कळक मनांतिल
नव्हती घुमली त्यांतुन मुरली !!

वाट समोरिल भान विसरुनी
नव्हती झाली उन्मन राधा ;
शीड मनाचें नव्हतें पागल
झोकुनियां वाऱ्याची बाधा !!

तोंच तुझ्या डोळ्यांतुन उडुनी
पिवळ्या चोंचीचा तपकिरि क्षण
मनांतल्या हिरव्या फांदीवर
साळुंकीपरि बसला येउन !!

हिशेब हुकले : आणि उडाले
धूर्त आंकडे पक्षी होउन ;
सूर होउनी रुजला वारा
कळकाच्या गहिऱ्या मौनांतुन !!

११-८-५५

## मी जगतों

अशी अचानक उगवतेस तूं
घरांत येसी मलाच नकळत
मोरपंखि रंगाचे
हात किलकिले ठेवुनियां
दिशादिशांच्या डोळ्यांवरतीं...

तूं आल्यावर
हसती कौलें झरा उन्हाचा ;
धरितें अंगण फेर घराच्या भवतीं
परी होउनी;
खिळलेलें घर माझें होतें
ओठांवरतीं मातीच्या झुलणारें
लहरी...स्वरपंखी गाणें...

अशी अचानक उगवतेस तूं जेव्हां
मला वाटतें
मी जगतों :
माझ्याहिपलिकडे जाउन...

१२-८-५५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८८९३

# शल्य

मीं मातीवर पाय टाकिला
आणि टांचण्या पायीं घुसल्या ;
सहज पाहिलें मीं आकाशीं
लाख टांचण्या नेत्रीं रुतल्या !!

जनसंमर्दीं चहुं बाजूनीं
शब्द टांचण्या होउनि आले ;
...अस्तित्वाची जखम माझिया...
वाऱ्याचेही डोळे भरले !!

मनीं शून्यता गारुड्यापरी
ओकुं लागली फक्त टांचण्या
तें टोकेरी चेटुक सजलें
रंध्रारंध्रामध्यें दंशण्या

लाख टांचण्यांच्या अग्रांवर
भीष्म होउनी पडलों मी ; पण
इच्छेला टांचण्या बोचल्या
कुठली गंगा ? कुठला अर्जुन ?

२६-८-५५

## आणिक कांहीं

माझ्या आत्म्यामधली जादू
स्पर्शे जिचिया
रंध्रारंध्रांतुन फांद्यांच्या
उमलुन येती दिवे चिमुकले तांबुस हिरवे...
फुंकरिनें अन् जिच्या
जळावर उमटे गाणें अहेतुकाच्या वलयांचें
पसरत पसरत...स्वतःस विसरत
क्षितिजाला मिळणारें!!

माझ्या आत्म्याच्या स्मरणानें
मीं घेतां हातांत माझिया मुठभर माती
आणि उघडतां मूठ अचानक
त्या मातींतुनि उडतो
सोनेरी पंखांचा पक्षी
संथ हवेवर कोरित
लिपी बोलकी डौलदार गिरक्यांची!

माझ्या आत्म्यामधला अग्नी
पळसफुलांतुन
आगीचें चांदणें होउनी जळणारा
मिठीमिठींतुन फुलणारा :
मिठीच जेव्हां होते
दीप्त फूल पळसाचें...

माझ्या आत्म्यामधलें गाणें
हेवा करिती ज्याचा
ऐन जवानींत बुल्बुल पक्षी...
ज्याचें चुंबन घेण्यासाठीं
ओठ करुनि आषाढ ऋतूचे
आकाश वाकतें...
तें गाणें :
त्या ओठांना ऐकूं येतें...दिसतें...आणि स्पर्शतें

माझ्या आत्म्यामध्यें हें सारें,
आणिक कांहीं...आणिक कांहीं
अनंततेच्या पाण्यावरतीं
'आणिक कांहीं'चीं न संपणारीं वलयें
नव्या नव्या क्षितिजांशीं कानगुजें करणारीं
आणि कधिंमधीं हरवुनि जातां मी
मला गवसणारीं
...अकल्पित...

३०-८-५५

अनुक्रम २१०९३ वि: ८३।०५[illegible]
क्रमांक ७३५२ नों: दि: २५।[illegible]

## सत्य

फिरलों होतों जेव्हां आपण
उन्मन होउन
...जगण्याची आसक्ती होती निर्हेतुक ती...
कळलें होतें
तेव्हां पुरतें दोघांनाही :
वारा जेव्हां मुरली होतो
झाडांच्या पानापानाचे कानच होती ;
माती जेव्हां होते तृष्णा
खडकाच्या फांदीला फुटतें
पान झऱ्याचें लवलवणारें

म्हणायचिस तूं
शोधायाचें आहे मजला सत्य जीवनामधलें
विसरलीस पण कसें अकालीं उधाण सारें !
...सुचूं नये त्या वेळीं तुजला हिशोब सुचला
दाट रानगवताचा श्वासुन उग्र गंध तूं
नाहिं विसरलिस मुळीं स्वतःला !!
तुझीं पावलें विसरुनि गेलीं
उनाड होउनि धोपट वाटा
हुलकावुनि जाण्याची शक्ती !
खिळलेल्या झाडांना देखिल स्वैर करी जी
भटकी शीळ न ऐकूं आली तुला मुळीं ती...

ज्यांत बुडालें आकाशहि हें
अगणित अपुल्या नक्षत्रांसह

मनावर अशा धुंद क्षणीं त्या :
आवरलीं जर असतींस तुझ्या
ओठांवरलीं गणितें सावध......
पायतळींच्या मातीपरि तूं
अवचित जर असतीस घसरली
कळलें असतें सत्य तुला तें शोधावांचुन
...सत्य वाहतें रक्त होउनी
जगणाऱ्यांच्या धमन्यांमधुनी...
अजूनही तूं म्हणतच फिरसी :
शोधायाचें आहे मजला सत्य जीवनामधलें...

४-९-५५

## विसरायाचें म्हणशिल जितुकें

विसरायाचें म्हणशिल जितुकें
तितुकें अधिकच सारें स्मरशिल
दूर जायचें म्हणशिल जितुकी
तितुकी अधिकच जवळी येशिल

ती तिथली छायांची जाळी
अधिकच छळतिल त्या रात्री तुज...
श्वाससुगंधित हळव्या शपथा
शब्दाविण डोळ्यांचें हितगुज

पानांचा हिरवा आडोसा
थरथरणारे मनीं कवडसे...
असून ठाउक सारें सारें
ते शब्दांचे भोळे वळसे !!

कुजबुज टिपण्यास्तव बसलेली
ओठांची चिमणी गालावर...
...ती गट्टी अन् गट्टी फू ती :
राग तुझ्या अगदीं नाकावर...

ते शब्दांचे अर्थच भलते
नको नकोला हवेंच सारें...
" छळून घे छळणार तेवढें...
...मी गेल्यावर स्मरशिल का रे ?"

धूसर ओली पहाट अन् ती
गवतावरतीं दंव पडलेलें
तें चंद्राचें बुजरें कबुतर...
...घडूं नये तें अन् घडलेलें...

घडूं नये पण घडून यावें
विसरावें...पण कसें विसरशिल ?
दूर जायचें म्हणशिल जितुकी
तितुकी अधिकच जवळी येशिल ! !

६-९-५५

# स्पर्श

क्षणाक्षणाला हरवुनि जातो
स्पर्श तुझा तो :
किडा आंधळा सरपटणारा
चपल तरल अन् आकाशखुळें फूलपांखरूं
यांच्यातिल जो अंतर सांधी,
जो मातीला
आषाढानें
आकाशाशीं बांधी,
जो दगडाचे मिटतो डोळे
आणिक करतो क्षणांत त्याला
लुकलुकणारा
प्रकाशपंखी तारा...

क्षणाक्षणाला हरवुनि जातो
स्पर्श तुझा तो...
गजबजलेल्या गर्दीमध्यें
अवचित मी होतसें पोरका
विसरुनि ओळख आणिक परका...

कळ माझी ती केवळ ठाउक
दगडामधल्या वांझपणाला...
कळ माझी मी सोशीत उभा :
हसणाऱ्या या गर्दीमध्यें
रडणारा मी शून्य एकला

२३-९-५५

# असंभवाचा देठ तुटेना

काळोखाची जिद्द अशी कीं
कांहीं केल्या मुळीं हटेना
डाळिंबांतिल तांबडगहिरी
पहाट क्षितिजावरी फुटेना

लाल तुऱ्यांचे फूलकोंबडे
जास्वंदीच्या फांदीवरले
'कुकूचकू'चे गेंद शेंदरी
चोंचीमध्यें मिटून बसले!

बांधावरल्या वेताळाचा
कधींच सरला रात्रपहारा
सरला त्याच्या जाड जुत्यांचा
तो आवाजहि करकरणारा

लांब लांब टाकुनियां टांगा
कधींच आले माड भटकुनी
साळसूदसे बसले पेंगत
खिळलेल्याचें सोंग आणुनी

अजून भलते भासच होती
असंभवाचा देठ तुटेना
काळोखाची जिद्द अशी कीं
कांहीं केल्या मुळीं हटेना

२१-१०-५५

## सोहळा

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां
तो जाला सोहळा धनोपम

सोहळ्यासाठीं त्या लाविलें तिकीट
आणि केली धीट जाहिरात...

होतां भोंवतालीं बहू गर्दी गोळा
बाजारहि काळा केला थोडा...

आनंदें दाटलीं तिन्ही त्रिभुवनें
सर्वात्मकपणें लूट केली...

एकदेशी होतों आत्म्यानें आथिला
त्याच्या त्यागें जाला सुकाळ हा...

फिटलें सुतक वाण्याच्या बिलांचें
खिसा निःसंकोचें जाड झाला...

हिरव्या नोटांचा वसतीस ठाव
ठरवून भाव ठेलों पायीं

जगण्याचें आतां सरे सारें दुःख
'घरांतहि' सुख मिळों लागे!!

२२-१०-५५

## तूं असतांना

शहाळ्यांतल्या मलइसारखें
ऊन, तुला आवडतें भारी ;
तूं असतांना हवीच मजला
हिरवळ ओली लुसलुसणारी...

तूं असतांना मला वाटतें
श्वासांनीं भोगावी माती...
डोळ्यांच्या होडींत बसुनियां
दोन भावल्या भटकत जाती...

तूं असतांना धुरकटलेलीं
कडवट दुःखें विसरुन जातों
...पिक्या टपोर क्षणांचीं द्राक्षें
ओठांवरतीं पिळून घेतों...

सर्वांगानें सुख भोगावें
कसें तुला तें पुरतें ठाउक
स्पर्शांतुन भिनविसी फुलांचें
तूं रंगीबेरंगी कौतुक !!

तूं असतांना मनांत झुलते
नक्षत्रांची शुभ्र डहाळी
तुझ्या नि माझ्यासाठीं झुरते
चंद्राची होडी आभाळीं

२३-१०-५५

# पानमोकळें

ढाळुनि सगळीं पानें
मातीच्या काळयाकबऱ्या मौनावर ;
देठपिक्या
अबोल पिवळया गिरक्या
पाहत गूढपणानें
झाड समोरिल उभें राहिलें
पानमोकळें

तेव्हां—
चौकोनी थंडपणाच्या
कैदेंत हिंवाळयाच्या
पडली होती हिरवी इच्छा...
आणि उन्हाची पिवळी होडी
गवताच्या थिजल्या राखट पाण्यांतुन
अडकुन पडली होती...
बोटांस पहाटेच्या
होतीं टोकें बर्फाच्या किरणांचीं...
मनांत अन् पाण्याच्या
दाटुनि आलें होतें
हिरमुसलेंपण थंडगार...रुसक्या·शेवाळी रंगाचें
...झाड समोरिल तेव्हां...पानमोकळें
नजरेनें पिउनी आकाशाचे घोट निळे
स्तब्ध राहिलें :
भोगीत स्तब्धता
समृद्धपणें—

कैद हिवाळ्याची
अधिकच झाली सक्त;
थंड हवेंतुन उडून गेल्या
पांच शुभ्र पक्ष्यांच्या प्रतिबिंबांचें
गोठुनि झालें बर्फ मनांत जळाच्या...
परंतु तेव्हां
झाड समोरिल रसरसत्या कैफानें
भोगित होतें पानमोकळ्या रितेपणाला
समृद्धपणें...

३-१२-५५

# काळोखांतुन दोन क्षणांना

काळोखांतुन
तीव्र अनावर
दोन क्षणांचा
सोनझिणझिणा दाब मनावर
पहाट सोन्याची होउनियां
धमन्यांमधुनी जाइ उजेडत...

काळोखांतुन
दोन क्षणांची
दाट निळ्या झेपेची भरती
गिळीत जाते
स्तिमित किनारा...
सगळें बुडतें,
उरतो केवळ एकच तारा :
काळोखाच्या डोहावरचा
तो एकुलता शुभ्र पहारा...

काळोखांतुन
दोन क्षणांना ऐकूं येते
पल्याडच्या त्या
उंच मनोऱ्यावरची घंटा :
जी न कधींही कुणास दिसते
जी न कुणाला ऐकूं येते...

२२-१२-५५

## डंख

काळ्यानिळ्या वेदनेचा
झाला काळोखाला डंख
जेव्हां शपथ घालून
तोडिलेस माझे पंख

ओळखीच्या अंधारांत
अनोळखी झालीस तूं...
...खोटें खोटें हसतांना
खोल किंचाळले हेतू...

सारेंच का खोटें होतें?
काय सारी भूल होती?
पांगाऱ्याला कांट्याआधीं
लाल फुलें आलीं होतीं?

माझ्या मनीं काळोखांत
भिनलेला डंख उरे—
वेदनेच्या पांगाऱ्याचे
मला कांटे, तुला फुलें

१-१-५६

## ते गाणारे डोळे

ते गाणारे डोळे
नाहीं आठवणार पुन्हां...
झुऱ्याबावऱ्या अंधारांतिल वाटहि ती
दोघांची—दोघांपुरती...
एकांताच्या अर्ध्यामिटल्या डोळयांवर फिरणारें
तें पीस कवडशाचें सुरकें...
दोघांनीं पाहियलेली...अनुभवलेली
ती एक चांदणी
फूल जुईचें झालेली...
विश्वासहि तो
आकाश प्रसवणारा
नाहीं आठवणार पुन्हां !

सारें...सारें
पुरून टाकिन त्या निर्जन वाटेवरतीं
मातीच्या पांच थरांखालीं
उगवलेंच जर का झाड तयांतुन
रहस्य फांद्यांचें...हिरव्या पानांचें...लाल फुलांचें
दूर देशच्या अनोळखी
गाणाऱ्या पक्ष्यासाठीं...

मी म्हणेन तेंहि दुरूनच :
"दूर देशच्या अनोळखी गाणाऱ्या पक्ष्या
नकोस गाऊं रहस्य माझें या झाडावर बसुनी

नको करूं झाडास बोलकें...गाणारें...
शपथ तुला—तुझ्या मनांतिल जखमेची
उडून जा...उडून जा...
...आठवायचे नाहिंत
ते गाणारे डोळे कधीं पुन्हां···”

१-३-५६

गिरकी

समोरच्या हिरव्या झाडावर
मऊ पिसांचें इवलेंपण गोजिरवाणें
गातें आहे गाणें :
"इथून
हिरव्या इथून
तिकडे
निळयापांढऱ्या तिकडे
गेलेंच पाहिजे मला..."

...गेलेंच पाहिजे मला
गेलेंच पाहिजे मला...

ऐकत असतां,
खिडकीची हट्टी चौकट
मीं इथेंच बसुनी उंच उडविली पतंगापरी...
या अडेल भिंतींची—मठ्ठ पहाऱ्याच्या
क्षणांत केली हवा :
विवस्त्र होउन
पिवळ्या पिवळ्या उन्हांत न्हाणारी...
डोक्यावरचें छप्पर डफ्फर नुसतें
मीं पिसासारखें दूर उडविलें
घालुनि बेछुट फुंकर...

ललललला...ललललला
गेलेंच पाहिजे मला...
सोनेरी केसांच्या
खट्याळ मिस्किल डोळ्यांच्या
हातांत गुंफुनी हात उन्हाच्या
घेत घेत गिरक्या
न थांबणाऱ्या, न संपणाऱ्या
गेलेंच पाहिजे मला
तिकडे—
निळ्या पांढऱ्या तिकडे
त्या उंच कड्यावर
त्या उंच कड्याच्या पल्याड...गहिऱ्या पल्याड...
गेलेंच पाहिजे मला...

केव्हांपासुन आहे सर्व तयारी...
एवढेंच माझें ऐक जरा ग :
हें गाठोडें
माझ्या सगळ्या दुःखांचें, चिंतांचें
पोखरणाऱ्या...
आणिक ही माझी काठी
जी मला हवी आधारासाठीं
(भार जगाचा उचलुनियां घेतांना !
नाहीं तर हें बुडेल ना जग ! !)
हें सारें
ठेवशील ना जपुनी ?
शपथ गळ्याची

आल्यावर घेऊन सगळें ओझें
पुन्हां एकदां खांद्यावरतीं
पण आतां गेलेंच पाहिजे मला...

गिरक्या...
न-थांबणाऱ्या
न संपणाऱ्या गिरक्या
तल्लख हिरव्या गिरक्या
सोनेरी पिवळ्या गिरक्या...
गिरक्यांचे झुबके
एकींतुन दुसरी...दुसरींतुन तिसरी
गिरक्यांचें उनाड ब्रह्म...

२३-३-५६

## हृदय तुझें

हृदय फुलाचें
नाहिं वेगळें
झुळझुळ गंधाहुन...
डोळयांत गुलाबी पंख पसरणाऱ्या रंगाहुन...
आणि पाकळयांच्या
कलत्या...वाटोळ्या
गोफ सुगंधाचा धरणाऱ्या सांखळिहुन
हृदय फुलाचें नाहिं वेगळें...

हृदय तुझें
मीं न शोधितां मला मिळालें :
तो स्पर्श तुझा :
गुणगुणलीं इंद्रधनुष्यें
रक्ताच्या थेंबाथेंबांतुन
ती कुजबुज : रानफुलांचा झुबका
अनोळखी वाटेच्या हातांतिल...
गंधधुंद ती मिठी...
मिठींत जेव्हां नेली हरवुन पृथ्वी...
गेलें हरवुनियां नभ...
हृदय तुझें
मीं न शोधितां मला मिळालें
मीं मलाच जेव्हां पार बुडविलें या सर्वांतुन...

हृदय फुलाचें
नाहिं वेगळें मुळीं फुलांहुन

२०-३-'३६

## तुला पाहिलें मीं हसतांना...

ढगाळलेल्या उदास दिवशीं
तुला पाहिलें मीं हसतांना
तशीच हट्टी करून जिवणी
जीव कुणाचासा घेतांना...

आठवणींतिल निळें चांदणें
तीक्ष्ण बर्फ जाहलें गोठुनी
आणि हरवल्या क्षितिजावरची
जखमहि आली पुन्हां दाटुनी

मला वाटलें पुन्हां करावी
जखम तुझ्या हृदयांतिल जागी
उकरुनि वरचें निळें चांदणें
अहेर द्यावी रात्र अभागी

डोळ्यांतिल पण तुझ्या चांदण्या
दिसल्या थकलेल्या कोमेजुन
डोळ्यांखालीं डोहच काळे
ज्यांत बुडाली नजर विस्कटुन

न बोलतांही मला म्हणालिस :
स्मितें रंगवुन अशींच द्यावीं
जमेल त्यानें ठिकऱ्यांवरतीं
रंगांचीं ठिगळें पसरावीं

आणि भासलें मला म्हणालिस
तशीच त्या अगतिक वाटेवर
"थकलें रे..." शब्दांचें झालें
काळोखाचें खोल सरोवर

आणिक कळलें उरला केवळ
काळोखच दोघांना बुडवुन
डोळ्यांखालीं डोहच काळे
तिथें उभें एकटें सुनेंपण

१-५-५६

# मनांत ओल्या तृप्त सावल्या

नुकत्या न्हालेल्या केसांपरि
सतेज ओल्या तृप्त सावल्या...
रंग पोपटी उन्हास लागे
लोळत गवतावरी पसरल्या

करीत फडफड पंख आपुले
उडेल वाटे वारा शुभ्र...
अंग उन्हानें आंत पहावें
अशा नितळ या दिशा निरभ्र

ताडाच्या पंख्यांना स्मरती
गार कळ्या थेंबांच्या इवल्या,
सर्वांगांतुन फुलल्या जेव्हां
लुकलुकत्या चांदण्या कोवळ्या

काल रात्रिच्या सुवास होता
सुगंध मातीचा भिजलेल्या...
नुकत्या न्हालेल्या केसांपरि
मनांत ओल्या तृप्त सावल्या

२-५-५६

## वज्रपुरुष

वज्र विजेचें वक्षावर झेलुन घेणाऱ्या
सह्याद्रीच्या उंच कड्यानें दिधली छाती
आणि घडविलें पोलादानें मनगट त्याचें
अन्यायाच्या विटा विटा उस्कटण्यासाठीं

नाठाळाच्या माथ्यावरतीं हाणूं काठी
वदणाऱ्या देहुच्या तुक्यानें दिधली वाणी
शब्दाशब्दामधून त्याच्या उसळत होतें
तलवारीचें शिवबाच्या लखलखतें पाणी

या मातीचें पुण्य असें कीं हिच्या मुलांनीं
अन्यायाच्या पुढें झुकविला कधीं न माथा
भावभाबडी मराठमोळी अभंग श्रद्धा
इंद्रायणिच्या पाण्यावरतीं तरला गाथा

या मातीवर उभा राहतां वज्रपुरुष तो
अंधाराच्या साम्राज्याची पिचली छाती
आवाहन करण्यास उचलतां हात तयानें
दलित तृणांतुन उठलीं वर खड्‌गांचीं पातीं

राखेचेही क्षणांत झाले लाल निखारे
शून्यांतुन अन्‌ क्रुद्ध करांचें जंगल उठलें
आणि फाटक्या सदऱ्यांमागिल क्षीण बरगड्या
दधिचीच्या अस्थींचें त्यांतुन वज्र प्रगटलें

अजून घुमते या भूमीवर त्याची वाणी
दगडालाही फुटतो अन् सूर्यांचा अंकुर
आणि घडो अन्याय कुठेंही पृथ्वीवरतीं
इथल्या जनहृदयांतिल होतो जागृत शंकर

वज्र विजेचें वक्षावर झेलुन घेणाऱ्या
सह्याद्रीच्या उंच कडयाची त्याची छाती
आणि घडविलें पोलादानें मनगट त्याचें
अन्यायाच्या विटा विटा उस्कटण्यासाठीं

३०-७-५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २१८१३ वि: काव्य
क्रमांक २३६०२ नों: दि: २५/६/

# पुन्हां एकदां

पुन्हां एकदां
उधळ मला तूं
ऊन जसें हिरव्या गवतावर
पुन्हां एकदां जमव मला अन्
शुभ्र दंवाच्या
लुकलुकत्या बोलक्या मनांतुन
—पहांटणारें तें ओलेंपण
अजून जागें नसांत माझ्या !

पुन्हां एकदां
डोळ्यांनीं खुणवून तसें तूं
दूर मला ने
चुकवुन डोळे
आणिक फितवुन सर्व पहारे...
जिथें तरूंच्या आडोशाला
दचकलीस तूं...
—कुणि नाहीं ग
पानांमधुनी पक्षी उडुनी गेला !

पुन्हां एकदां
मिठींत बुडवित सांग मला तूं
करून डोळे तसे किलकिले अन् स्वप्नाळू :
"तुझ्या सवें राहीन उपाशी
नकोच वैभव...नको मला घर

फिरेन मी
रानांत मजेनें तुझ्या संगतीं
रानफुलांतुन पिउन चांदणें
निजेन अन् मी खडकावरतीं..."
—अन् श्वासांचे शब्द माझिया :
"वेडी कुठली..."

जूनपणाचीं मुळें भटकती
अंधारांतुन—
उगाच कां शोधीत जुने स्वप्नाळू डोळे?
ज्या स्वप्नांवर
तुझाहि नच विश्वास राहिला
मुळींच आतां...
—कौलांवरुनी ऊनहि गळलें
देठ पिकुनि तुटल्या पानापरि!

९-९-५६

## झाडच होतें श्रावण

श्रावणधारांची
सोनपिसांची
मिस्कील अचानकता,
झाड तें
अबोल दिसणारें
कधीं न हसणारें
कुणास ठाउक केव्हां
सांठवून ठेवतें...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८४१३

REFBK-0009413

आणिक नंतर
वाऱ्याला डोळा घालुन
उन्हाला उगीच चिडवुन,
अंगांगांतुन
उलगडुनी
उधळुनि देतें श्रावण!
हिरव्या पिवळ्या सळसळ
क्षणांत दडलेला
थेंबांच्या डोळ्यांतुन बुडलेला...

—क्षणभर
झाडच होतें श्रावण :
इवल्या थेंबांच्या पानांचा,
उन्हाच्या
झुलत्या लवत्या फांद्यांचा...

१६-९-५६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २१९९३ वि: काव्य
क्रमांक ९३८०२ नों. दि: २५/६/५८.